# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. २४/११/२००६
## (दि. २२/११/२००६ रोजीची तहकूब सभा)

मिरा भाईंदर महानगरपालिकेची दि. २२/११/२००६ रोजीची कोरम अभावी तहकुब झालेली स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक २४/११/२००६ रोजी सभा सुचना क्र. २१ दि. १७/११/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.४० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ५) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ६) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| ७) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ८) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| ९) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| १०) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |
| ११) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | सदस्य |
| १२) | श्री. परशुराम पद्‌माकर म्हात्रे | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| २) | श्रीम. गिता भरत जैन | सदस्या |
| ३) | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| ४) | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |

**मा. सभापती :-**

आजच्या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सदस्या व अधिकारी वर्ग, ही सभा आजच्या खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडाल अशी विनंती व सचिवांना सभेला सुरुवात करावी. धन्यवाद.

(नगरसचिव यांनी विशय पत्रिकेचे वाचन केले.)

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. १३६ चे वाचन केले.),

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब आजच्या इतिवृत्त मंजूरी करण्यापूर्वी मला जरा याच्यावर चर्चा करायची आहे.

**मा. सभापती :-**

चर्चा करुया. पण आधी विषय तर होऊ द्या.

**शशिकांत भोईर :-**

त्याच्यामध्ये मा. सभापती साहेबांचे वाक्य आहे की, विनंती करतो पण तिथे असे आले की तिथे ते विनंती करतात असे झाले.

**रमेश जैन :-**

पेज नं. ४ मे लिखा हुआ है की, हम लोगो को वहाँसे नो इनटीमेशन का है? नौ के बदले जो होना चाहिए।

**जेन्वी अल्मेडा :-**

पान नं. ६ मध्ये सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेबांचे वाक्य आहे. या ठिकाणी अमानत की अनामत.

**नगरसचिव :-**

अनामत.

**शशिकांत भोईर :-**

सचिव साहेब, पान नं. ८ मध्ये कनव्हर्ट पाहिजे होते तिथे कनव्हर्टर लिहिले आणि ४० लाख रु. पाहिजे तिथे १० लाख रु. केले त्याच्याच खाली इंजिनियर आहे त्यांना तर त्या ठिकाणी त्याला त्यांनी जो प्लॅन दिलेला आहे. तिथे त्यांनी पाहिजे. आणि जिथे स्लेप आहे तिथे स्लॅप पाहिजे पान नं. ९ मध्ये माझेच वक्तव्य आहे. खालून तिसरा पॅरेग्राफ मग, तसे असेल तर माझे म्हणणे आहे की, मी पुढील सभेत मांडेल. तर तिथे मांडतो हा शब्द पाहिजे. पान नं. १५ मध्ये विकास सरकारने त्या वेळेस पत्राने कळवायला पाहिजे होते की, आम्ही शासनाकडे डायरेक्ट सुपूर्त केले. साहेब, तिथे येथ केल. तर तिथे येथे पाहिजे. पुन्हा खालून तिसरा पॅरेग्राफ आहे. नगरपालिका ॲडीशनल टाकलेले आहे. तत्कालीन नगरपालिकेने जेव्हा टॅक्स लावलेला होता. त्यावेळी विकास कर्त्याचेही तर विकास कर्त्याही झाले तर तिथे कर्त्याचेही करा.

(सन्मा. सदस्य श्री. एस. ए. खान यांनी प्रकरण क्र. १३६ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**जेन्वी अल्मेडा :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. १३६ :-**

दि. १०/०८/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १४० :-**

दि. १०/०८/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. एस.ए. खान.** **अनुमोदन :- श्रीम. जेन्वी अल्मेडा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. १३७ चे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, प्रकरण क्र. १३७ वार्षिक जमा खर्चाचा आढावा घेण्याबाबतचा सन २००५-२००६ चे मंजूर अंदाजपत्रकानुसार सन २००५-२००६ चे अंदाजपत्रकीय तरतूद व त्यानुसार झालेली जमा रक्कम त्या जमा रक्कमे मध्ये आपण अर्थसंकल्पाचे तरतूद २३,५०० ७८.६ लाख रुपयांची केली होती. तर, आपल्याकडे प्रत्यक्ष जमा रक्कम झालेली आहे. १२,९४२.८६ म्हणजे आपल्याला ह्याच्यामध्ये 'अ' मध्ये फरक काय आहे? कमीत कमी ११८ कोटी रु. चा फरक पडलेला आहे. हा फरक कसा पडला आणि कोणत्या खात्यातून पैसे जमा झाले नाही? म्हणजे आपण जसे हेड दिलेले आहे तर आपले प्रशासन त्याच्यामध्ये कोठे कमी पडलेले आहेत? त्याबाबत त्यांनी जरा खुलासा केला तर बरं होईल. आपलं आपण बजेट बनवताना फुगवलेले आहे का? की आपले येणारे बाकी आहे का? याचा खुलासा करावा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की सन्मा. सदस्यांनी सन २००५-२००६ चे वार्षिक लेखाचे अवलोकन केले असता एकूण जमा रक्कम २३,५७८.६ लाख रुपये प्रत्यक्ष जमा १२,९४२.८६ आणि जो फरक आहे १०६३५.२० हे सर्व फिगर लाखात आहे. हे जे फरक आहेत ते अ, ब, क, ड, ई या अर्थसंकल्पाचे एकूण हेड आहे. त्या अंतर्गतचा फरक त्या कॉलम नं.४ मध्ये दिलेला आहे. तर यामध्ये सर्वात जास्त फरक भांडवली जमामध्ये आहे. त्याच्यानंतर 'अ' अर्थसंकल्पाचा आहे. त्याचा जर आपल्याला डिटेल घ्यायचे म्हटले तरी आपल्याकडे तसा म्यॅन्युअल तयार आहे. म्हणजे आपल्याकडे पैने पै कमी कशात आहेत? हे सुध्दा आपल्याकडे रेकॉर्ड आहे. तर ते आपल्याला पर्सनली देऊ पण शकतो किंवा आपल्या लेखा विभागात पहायला मिळेल ही आपली डिफिसिट आहे. हे आपल्या निदर्शनास नियमानुसार आणून देणे भाग आहे. म्हणून आम्ही आणलेले आहे. यावर आपण चर्चा करु शकतो.

**शशिकांत भोईर :-**

त्याच्यावर चर्चा करतो की, आपल्याला त्याच्यावर विकास कर आहे तर तो कमी आला का? किंवा त्याच्यामध्ये जकात कर वसुल करतो त्याच्यामध्ये कमी आले का?

**एस. ए. खान :-**

डिटेल देण्यात आलेले नाही ना? कुठे कमी आहे.

**शशिकांत भोईर :-**

'अ' प्रमाणे दिलेले आहे. तिथे मा. उपायुक्त पानपट्टे साहेब यांनी सही दिलेली आहे. तर त्याच्यामध्ये जमा बाजुमध्ये सन २००५-०६ डायरेक्ट दाखवलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो. ) :-**

त्यामधल्या 'अ' बद्दल माहिति ती तुम्हाला देतो. 'अ' चे उदाहरण म्हणून आपल्याला ९,४८०/- रु.. जमा व्हायला पाहिजे होते. तर ते ८,४४१/- रु. जमा झालेले आहे आणि १,४३८ लाख रुपये जमा झालेले नाहीत. तर ते कोणत्या कोणत्या बाबी आहेत ते आपल्याला मी सांगतो. सर्वसाधारण कर म्हणजे मालमत्ता कर. आपण अर्थसंकल्पीय मध्ये ३८ कोटी ५० लाख रु. अपेक्षित केले होते. तर आपल्याकडे २४ कोटी ३१ लाख रु. जमा झालेले आहेत. साधारणतः १४ कोटी १८ लाख रु. डिफिसिट आहे.

**शशिकांत भोईर :-**

म्हणजे आपली वसुली झाली नाही की येणे बाकी आहे.

**रतन पाटील :-**

आपली वसुली झाली नाही की, केली नाही? आपण कमी पडलो की, ज्या सदनिका आहे त्याला सुध्दा टॅक्स लावलेला नाही.

**शशिकांत भोईर :-**

प्रशासन लोकांकडून वसुली झाली नाही म्हणून आपण सील बंद केले तर ह्याच्यावर काय कारवाई केली?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो. ) :-**

गेल्या वर्षीची अर्थसंकल्पीय तरतुद आणि त्याच्या वसुलीच्या रक्कमेच्या अनुषंगाने अजित पाटील साहेब आहेत. म्हणजे, त्या वर्षाची डिमांड किती होती? वसुली किती झाली? या अनुरुप आपण चर्चा केली तर ते फायनल होईल.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. प्रत्येक वेळेला बजेटच्या मिटींगमध्ये आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेचे भागभांडवल कसे वाढेल त्याबद्दल आपण नेहमीच चर्चा करीत असतो. या संदर्भात त्या मालमत्ता करामधून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल. त्याच्यासाठी ज्या नविन सदनिका आहे त्याला कर लावायचा असे ठरले होते. सदनिका तयार आहेत. त्यांना ५-५ वर्ष कर लावले नव्हते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो. ) :-**

ही कारवाई या वर्षात होऊ शकत नाही. ही त्या वर्षी ती डिफिसिट होती. या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये ती बाब आपण पूर्ण केलेली आहे. साधारण सहा कोटी रुपये पेक्षा जास्तीचे कर आकारणी आपल्याला मागच्या स्टॅन्डीगच्या मिटींगमध्ये अहवाल सादर केलेला होता की, आतापर्यंत झोन पाडून नवीन सदनिकेला कर लागलेला नाही. त्याला कर लावण्याचा कार्यक्रम घेतलेला होता आणि साधारणतः ६ कोटी रुपये पर्यंतची वाढ यावर्षी फायनल झालेली आहे. ते केलेले आहे.

**रतन पाटील :-**

पण, ती आता वाढवली गेली. याच्या अगोदर प्रत्येक वेळेला प्रत्येक बजेटमध्ये चर्चा केली होती. ती नवीन सदनिकेला टॅक्स लावले नव्हते ते आता लावले तो घोळ आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो. ) :-**

ते एक डेफिसिट आहे. बरोबर आहे. याशिवाय जकात करामध्ये आपण ५४ कोटी ४३ लाख रु. अपेक्षित केले होते. पण, आपल्याकडे ५४ कोटी, ९५ लाख रु. म्हणजे जवळपास ५१ लाख रु. अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा जास्तीचे जमा झालेले आहेत. सिनेमा, नाटयगृहे मध्ये आपण ५ लाख रु. अपेक्षित केले होते. पण आपल्याकडे साधारणतः ३८ हजार जमा झालेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपल्या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये सिनेमागृहे किती आहेत? आणि आता व्हिडीओ टॉकीज आहेत त्याचे सुद्धा कर येणे गरजेचे आहे. व्हिडीओ टॉकिजवर सुद्धा आपण कर आकारत नाही. करमणूक करातून आपल्याला त्याचा फायदा आहे.

**मा. सभापती :-**

४ टॉकिज आहेत ना? बाकीचे व्हिडीओ टॉकिज आहेत ना?

**रतन पाटील :-**

मागच्या वेळेला बजेटच्या विषयामधील चर्चा झाली होती. शहरामध्ये व्हिडीओ टॉकिज आहेत त्याच्यावर कर आकारणी करा.

**शशिकांत भोईर :-**

आपण टॉकिजवर लक्ष देतच नाही.

**रतन पाटील :-**

त्यावेळेला असं उत्तर दिलं की, हे कलेक्टरच्या अंडरमध्ये आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो. ) :-**

ते बरोबर आहे. पण ह्याच्यासाठी शो टॅक्स कलेक्टर लावतात. त्याच्यामध्ये २% आपल्याला रिबीट भेटतो. आपण त्याच्यामध्ये डायरेक्ट लावू शकत नाही. आपण करमणूक कर इंन्डपेन्डंट घेतो.

**रतन पाटील :-**

साहेब, आपण घ्यायला पाहिजे. ते शहरामधले उत्पन्न आहे.

**शशिकांत भोईर :-**

जे घ्यायला पाहिजे ते आपण घेतच नाही.

**श्रीकांत मोरे (मुख्य लेखाधिकारी ) :-**

आपण प्रतिसेवा मागे करमणूक कर घेतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो. ) :-**

तो फार कमी आहे का?

**श्रीकांत मोरे (मुख्य लेखाधिकारी ) :-**

हो, कमी आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. आयुक्त (मु.) सा़ो. ) :-**

किती आहे?

**श्रीकांत मोरे (मुख्य लेखाधिकारी ) :-**

१०-१५ रु. प्रतिसेवेमागे आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपल्या अधिनियमामध्ये किती घेऊ शकतो?

**रतन पाटील :-**

वाढवण्यासंदर्भामध्ये काही नियम आहेत का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो. ) :-**

आपण जाहिरात पर्यंत आले होते.

**शशिकांत भोईर :-**

जाहिरातकर आहे ना, त्याच्यात बरेंचसं मोठमोठे बॅनर्स लावलेले आहे. ते जाहिरात कर विभागामध्ये येतील ना? आपण आकारणी प्रत्येक दुकानामध्ये केली होती. त्यानंतर प्रत्येक दुकानवाल्याने आक्षेपपण घेतला. पण, त्यानंतर आपण जे २० स्क्वेअर फीट च्या बोर्ड लावायला. दुकानाला परवानगी दिली होती. तर त्या पेक्षा जास्त बोर्ड आहेत. तर त्यामध्ये त्यांची वसूल झाली नाही का?

**रतन पाटील :-**

मिरा-भाईंदर शहरामध्ये होल्डिंगचे एवढे बोर्ड आहेत की, काही ठिकाणी महापालिकेचे दुर्लक्ष आहे. शहराच्या दृष्टीने महापालिकेचे उत्पन्न वाढायला पाहिजे. पण जो ठेकेदार दिलेला आहे. त्या ठेकेदाराचे उत्पन्न वाढलेले आहे. महापालिकेला काय मिळते? साहेब, त्यांना ठेका देऊन ५ वर्ष झालेला आहे. ५ वर्षामध्ये त्यांचे होल्डिंग्स वाढलेले आहेत की, ते विचारु नका. होल्डिंगची साईज आणि त्याच्यावरचे नंबर.....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो. ) :-**

बरोबर आहे, ही वस्तूस्थिती आहे. तो ठेका ४ वर्षापूर्वी दिलेला होता. त्यावेळेची परिस्थिती आपल्याला बेनिफिट च वाटत होती. पण, आजची परिस्थिती वेगळी आहे. आपण म्हटल्याप्रमाणे या अनुषंगाने प्रशासनाच्या अनुषंगाने आपल्याला आश्वासित करु इच्छितो की, यांच्यामध्ये कॉम्पीटीटीव्ह बीड करुन एक एजन्सी निश्चित करावी लागेल. पूर्ण शहराचा सर्व्हे करुन लोकेशन फिक्स करावे लागतील. आणि एका प्रायव्हेट एजन्सीला आपल्या शहरामध्ये ॲप्रोप्रियेट होल्डिंग जागेचे बोर्ड फिक्स करावे लागतील. आणि त्याचा वार्षिक ठेका द्यावा लागेल. साधारणतः ही बाब २-१ कोटीच्या वर जाईल. त्याचा आम्ही डिटेल काढतोय. ही मुदत संपायच्या आत २ महिन्यापूर्वी आपल्याकडे हा अहवाल प्रशासकीय मंजूरीसाठी त्या विभागामार्फत सादर करु.

**रतन पाटील :-**

साहेब, त्याची मुदत कधी संपेल?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ती टेंडर रद्द करु शकतात का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो. ) :-**

तसे करता येत नाही. टेंडर रद्द करण्यापेक्षा टेंडर संपतच आलेले आहे. त्यासाठी प्रशासनाची पुढील नियोजन करणे अपेक्षित आहे. ते करुन मॅक्सीमम उत्पन्न खरं तर हे सभागृह नाही आहे आणि मी ज्यावेळी टी.एम.टी ला काम केले. त्या ठिकाणचे उत्पन्न ८७ लाख रु. जाहिरातीचे होते. २ कोटी ७२ लाख रु. तिथले आम्ही फायनल केलेले आहे. आणि नॅशनल लेव्हल च्या एजन्सीला बोलावले ते काय करतात तर पूर्ण शहराचा अभ्यास करतात, वेगवेगळे स्पॉट फायनल करतात. मॅक्सीमम जाहिराती कुठून होऊ शकतात अशा ठिकाणी त्यांनी वेगवेगळे स्वतःचे होल्डिंग तयार करतात. आणि एक शहराचा टोटल जाहिरात एरिया काढतात. आणि त्याचा बीड करतात. त्याशिवाय इतरत्र त्यांना जाहिराती लावू देत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ह्यामध्ये १० x २० चे परमिशन घेतलेले आहे. व लावतात २० x ४०.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

मुदत संपल्यानंतर ती कारवाई आपण करु.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, हे टेंडर नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, आतासुद्धा आपण त्याच्यावर दंडात्मक कारवाई करु शकतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, असे आहे की, जे प्राव्हेट लोक जे आहेत ते स्वतःच्या बिल्डिंग वरती व स्वतःच्या प्रॉपर्टी वरती होल्डिंग्ज लावतात. ते होल्डिंग्ज लावताना तुमच्याकडून १०x २० ची परमिशन घेतात आणि लावतात २० x ४० ची असे भरपूर प्रायव्हेट होल्डिंग्ज आहेत आणि तुम्ही जे बोलता ते ठेका पद्धतीने ते वेगळे टेंडर आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

आपल्या सार्वजनिक जागेवरचे टेंडर आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही दोन प्रकारचे टेंडरचे बोलतात एक तर तुम्ही तुमच्या सार्वजनिक जागेवर टेंडर काढलेले आहे. आणि एक प्रायव्हेट जागेच्या टेंडरला परमिशन दिलेली आहे. तर त्याच्या होल्डिंग्ज आहेत. त्या होल्डिंग्ज वाल्यांनी आपल्याकडे परमिशन कमी घेतलेली आहे. आणि त्यांनी लावल्या जास्त. असे आपल्याकडे भरपूर होल्डिंग्ज आहे. साहेब, तुम्ही त्याच्यामध्ये सर्व्हे करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

खाजगी जागेवरील आपल्याला काही बेनिफिट आहे का?

**मा. उपायुक्त (श्री. संभाजी पानपट्टे साो.) :-**

खाजगी जागेचे परमिशन आपण देतो ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

आपण त्याला काही टॅक्स लावतो का?

**शशिकांत भोईर :-**

लावायलाच पाहिजे. जाहिरात आपल्या शहरामध्ये येते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

सर्व्हे मोठी होत नाही.

**मा. उपायुक्त (श्री. संभाजी पानपट्टे साो.) :-**

पूर्ण शहराचा सर्व्हे करणार आहोत.

**मा. सभापती :-**

तो सर्व्हे कधी करणार?

**मा. उपायुक्त (श्री. संभाजी पानपट्टे साो.) :-**

एप्रिल महिन्यामध्ये सर्व्हे करणार आहोत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

एप्रिल महिन्यामध्ये सर्व्हे करुन तो अहवाल तुम्ही स्टॅण्डींगमध्ये दिला तर बर होईल. मग, आम्ही तुम्हाला त्याच्यामध्ये चुका दाखवून देतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

पण, त्यानंतर क्रॉस टेंडर काढण्याची कारवाई करता येईल.

**शशिकांत भोईर :-**

त्या जागेवर दुकानदार आहेत. दुकानदार मोठेमोठे होल्डिंग्ज दुकानावर लावतात. २ x १० गॅप म्हणजे २० स्क्वेअर फिट बोर्ड लावायची. त्याच्यानंतर जे जास्त लावलेले आहेत. त्यांना आपण आकारणी केलेली नाही. पण, ती जकात सर्वांना आहे. जाहिरातकर हा सर्वांना लागू केलेला आहे. त्याच्यावर प्रत्येकांनी आक्षेप घेतला आहे की, आम्हाला जास्त आला आहे तो कमी करा. तद्नंतर मग कारवाई नाही. त्यांच्याकडून आपण कधीच जाहिरात कर वसूल कर केला नाही.

**मा. उपायुक्त (श्री. संभाजी पानपट्टे साो.) :-**

साहेब, ठरावच असा झालेला आहे. स्वतःची जाहिरात असेल तर त्याच्यात जाहिरात लावू नये, म्हणून असा आपला ठराव झालेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

कोणत्या ह्याच्यामध्ये ठराव झालेला आहे?

**मा. उपायुक्त (श्री. संभाजी पानपट्टे साो.) :-**

ठरावात आहे.

**शशिकांत भोईर :-**

स्वतःची म्हणजे?

**मा. उपायुक्त (श्री. संभाजी पानपट्टे साो.) :-**

आर.पी. किराणा स्टोर स्वतःच्या जाहिरातीचे कितीही बोर्ड असू शकतात. त्याला काही जाहिरात लावलेली नसतील.

**रतन पाटील :-**

असे कसे बोलता? दुकानाचे कर आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

दुकानाचे जे टायटल आहे ना त्याला जाहिराती लावू नये म्हणून....

**मा. उपायुक्त (श्री. संभाजी पानपट्टे साो.) :-**

जे असेल त्याला आपण जाहिरात लावतो.

**शशिकांत भोईर :-**

सोनी चॅनल चे बोर्ड लावतात. नोकिया चे बोर्ड लावतात.

**रतन पाटील :-**

त्याच्या बोर्डातून आपण जाहिरात कर घेत नाही?

**मा. उपायुक्त (श्री. संभाजी पानपट्टे साो.) :-**

नाही.

**रतन पाटील :-**

त्यांनी मागच्या वेळेला बिल काढली होती.

**मा. उपायुक्त (श्री. संभाजी पानपट्टे साो.) :-**

बिल काढली होती.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

पानपट्टे साहेब, या वेळेला या सभागृहाची अपेक्षा एकच आहे की, जाहिरातीच्या माध्यमातून मॅक्सीमम रेव्हेन्यू आपल्याला भेटायला पाहिजे. आणि त्यावर कारवाई व्हायला पाहिजे. कोंडवाडेसाठी आपल्याकडे अपेक्षित ५ लाख रु. ची तरतूद होती. ती १ लक्ष २२ हजार रु. आहे. होल्डिंग्जची ३० लाख रु. अपेक्षित होते. पण, आपण २२ लाख रु. केलेले आहे. अग्निशमन कर ८० लाख रु. अपेक्षित होते तर आपण ७१ लाख रु. करुन घेतले.

**एस. ए. खान :-**

कुठल्या 'ब' मध्ये अग्निशमन दल आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

आपण जे विकास परवानगी देतो ना त्यांच्या सोबत आपण अग्निशमन फी वसूल करतो. ती बाब आहे.

**एस. ए. खान :-**

लेखा शिर्षक जे दिलेले आहे. ते कुठेच नाही.

**मा. उपायुक्त (श्री. संभाजी पानपट्टे साो.) :-**

अग्निशमन सेवा ही टॅक्स मध्ये येते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

बाजार लिलाव २ कोटी ५० लाख रु. अपेक्षित होते. तर त्याचे १ कोटी ७८ लाख रु. जमा झालेले आहे. रस्ता नुकसान, भरपाई बांधकाम, एक कोटी ५ लाख रु. जमा दाखवलेले आहे. म्हणजे आपण जास्त ५ लाख ४२ हजार रु. दाखवलेले आहे. ते जास्तीचे जमा झालेले आहे. टेंडर फार्म फी, मालमत्ता ट्रान्सफर फी, ५० लाख रु. अपेक्षित होते. तो प्रत्यक्ष जमा मध्ये ५३ लाख ३६ हजार रु. आहे. इमारत परवाना फी ज्याचा आपण विकास आकार म्हणतो. तो ८ कोटी रु. अपेक्षित होता. तो ७ कोटी ८४ लाख ९० हजार रु. आपण त्या वर्षात वसूल केलेले आहे. घरगुती, गाळेदुरुस्ती ह्याच्यात नाही. विशेष हस्तांतरण फी ह्यांचा जे स्टॅम्प डयुटी आपल्याला भेटतात. २५ लक्ष रु. आपल्याला अपेक्षित होते तर ते २३ लक्ष ९७ हजार आपल्याला मिळालेले आहे.

**एस. ए. खान :-**

ते गर्व्हमेंटकडून येतात ना? स्टॅम्प ड्युटी व रजिस्ट्रेशन?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

हो, परवाना, दुकाने, आर्किटेक्चर फी १० लाख रु. अपेक्षित होते ते १५ लाख रु. आपल्याकडे जमा झालेले आहे.

**एस. ए. खान :-**

साहेब, त्याची पण आपल्याला माहिती घ्यावी लागेल की किती वसूल होते? आपल्याकडे तीन रजिस्टार आहे. त्यांच्याकडून वसूल किती होते? त्याप्रमाणे आपल्याला भेटतील.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

त्या कॅलक्युलेशन वर भेटतात.

**एस. ए. खान :-**

दर जास्त आहेत ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

यावर्षीचे जे येणार ते मार्चला येणार.

**एस. ए. खान :-**

आपण वसूली किती केली? त्याची आपल्याकडे माहिती आहे का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आता सन्मा. सदस्य एस. ए. खान साहेब जे बोलले आहे ना? स्टॅम्प ड्युटी रजिस्ट्रेशनचे जे ऑफिस आहे. त्या डिपार्टमेंटमध्ये किती लोकांनी तो जमा केला? आपल्याला किती लोकांनी दिला आहे? ह्याच्यावरती ट्रॅक आपण ठेवू शकतो का? किंवा ह्याच्यावरती आपण ऑडिट करु शकतो का? किंवा चेक करु शकतो का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

ऑडिट किंवा चेक करण्याची महापालिकेला गरज नाही. कारण, ते ऑथोराईज कॉम्प्यूटराईज सिस्टीम आहे. आणि त्याची सर्व लिगली पावती फाडली जातात. ते ॲग्रीगेट शासनाच्या ट्रेझरीला होते. त्यामूळे कोणत्या शहरातून किती रक्कम येते? ती शासनाला दररोज हेडला जमा होते आणि त्या परसन्टेज मध्ये आपल्याला रिबिट भेटतो. त्याच्यामुळे त्याच्यात शंका घेण्याचे काहीच कारण नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, तरी विषय लाससन्सच्या बाबतीत होता. तर, बजेटच्या मिटींगमध्ये सर्व दुकानदारांना, सर्व कारखानदारांना लायसन्स पद्धती जाहिर करायची असे बजेटच्या वेळेला ठरले होते आणि त्याच्याने आपल्याला २ कोटी रु. जास्त उत्पन्न मिळतील. असे ठरले होते. साहेब, ते अजून लागू केली नाही. दुकानदारांना आणि कारखानदारांना लायसन्स पद्धती लागू केली नाही. साहेब, का डीले चाललेलं आहे? का शहराचे उत्पन्न वाढू नये असे....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

आता त्यांची उपविधी अंतिम विस्तारीत आहे. आम्ही ते महासभेला सादर करु.

**रतन पाटील :-**

साहेब, गेल्या ५ वर्षापासून मी ओरडतोय....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

आता, आम्ही स्वतः हाती घेतलेले आहे. मागे २ बैठका घेतल्या आहेत. त्याचे मॅन्यूअल आम्ही तयार केलेले आहेत. दुसरी महत्वाची बाब म्हणजे, आमदार फंड खासदार फंडामध्ये आपण १ कोटी रु. अपेक्षित केला होता. तर, आपल्याकडे सन २००५-२००६ मध्ये ते ५६ लाख ९१ हजार रु. जमा झालेले आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ह्याच्यामध्ये कुठल्या कुठल्या आमदारांनी फंड दिला? ह्याचे जरा डिटेल द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

तुम्हाला ते वैयक्तिक पाहिजे का? सार्वजनिक.....

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ते सगळ्यांना सांगितलं तर बरं होईल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

सन २००५-२००६ मध्ये, आपल्याकडे निधी कोणाकोणाचा झाला? त्याच्याशिवाय कोणाचे नाही?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कोणी? कोणाचा आलेला आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

मा. मुझफ्फर हुसैन साहेब आणि मा. पालकमंत्री गणेश नाईक साहेब.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

या दोघांनीच ना. मग, खासदार प्रकाश परांजपे साहेबांनी फंड दिला नाही. साहेब, खासदार प्रकाश परांजपे यांना मिरा भाईंदर लोकांनी मतदान केलेले आहे. आणि ते मिरा-भाईंदर मध्ये लिडींग मध्ये होते. मग, त्यांनी फंड दिला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

मी इंटरफेअर करुन आपल्याला एक माहिती सांगू इच्छितो की, आपल्याला शासनाकडून दलित वस्तीमध्ये १ कोटी रु. अपेक्षित धरला होता. आपल्याला त्यावर ३५ लाख ३१ हजार रु. मिळाले आहे. आपण वित्त आयोग अनुदानामध्ये १ कोटी ३० लाख रु. अपेक्षित केला होता आपल्याला ४३ लाख रु. मिळालेले आहे. त्यावेळी वाल्मिकी आंबेडकर योजनेमध्ये ५० लाख रु. ची अपेक्षा केली होती. तर ८ लक्ष ३३ हजार रु. मिळालेले आहेत. पल्स पोलिओ अनुदानामध्ये १५ लाखाची अपेक्षा केली होती. तर ते २३ लाख ७८ हजार रु.

आपल्याला जास्तीचे मिळालेले आहे. आपण व्याज व इतर ठेवी मध्ये अडीच कोटी अपेक्षित केले होते तर ते आपल्याला १ कोटी ७४ लाख रु. मिळालेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

ठेवी काढल्या का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

आपल्याला त्याचा इंन्ट्रेस्ट मिळालेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपली जेवढी ठेवी असेल त्यामध्ये अंदाज घेतला असेल की एवढया ठेव्या ठेवल्या आहेत. तर आपण त्या ठेवी काढल्या का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

म्हणजे मॅच्युअर केले आहेत असे तुम्ही म्हणता का?

**शशिकांत भोईर :-**

हो....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

नाही, मी त्यांना तेच सांगितलं आहे. त्या त्या वर्षात व्याज आणि त्याची रक्कम मॅच्युअर होते. समजा, आपण या वर्षी २ कोटी रु. जमा केले तर यावर्षी जी मॅच्युअर डेट असेल तर त्या वर्षीच्या अपेक्षित इन्कममध्ये धरले जाते.

**श्रीकांत मोरे :-**

व्याजाचे दर कमी झालेत का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

आपण सुरक्षा अनामत परत करतो ते सांगुन उपयोग नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आता तुम्ही जे सांगितलेले ते जास्तीत जास्त वसुली झाली ते सांगितले. पण, कमीत कमी वसुली....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

ज्या फिगर्स डबल आहेत ते सांगितले आहे. मी असे कोणते कमी-जास्त सांगितलेले नाही. सन २००५-०६ मध्ये पाणीपट्टीमध्ये १६ कोटी ५५ लाख रु. उपेक्षित केले होते. खरं तर आपल्याकडे १८ कोटी २६ लाख रु. वसुल झाले. १ कोटी ७१ लाख रु. जास्तीचे उत्पन्न आहे. जे फॅक्ट आहे. ते आपल्यासमोर ठेवले.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तुम्हाला ह्याचे कारण सांगतो ज्या ठिकाणी २४ तासात पाणी पुरवठा होतो ना त्यांना सरासरीने एकत्र दिले जाते आणि ३६ तासाने, ४८ तासाने ज्यांना पाणी जाते ना त्यांना ही तेच दिले जाते. म्हणजे तुम्ही त्यांच्यावर अन्याय करता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

या फिगरमध्ये अपेक्षित अनाधिकृत नोंद जोडणी कडून साधारणतः एक कोटी रु. जमा करणे अपेक्षित होते. तिथे फक्त ९ लाख रु. जमा झालेले आहे.

**जयंत पाटील :-**

मा. उपायुक्त (मु.) साहेब, ज्यांनी आपल्याला दोन कोटी रु. वाढवून दिले. त्याचे तुम्ही अधिकार का काढले? मा. आयुक्त साहेबांनी त्यांना नोटीस पाठवली की, तुमचे सहीचे अधिकार काढून घेतलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

सहीचे अधिकार काढलेले नाही. साहेब, आपला गैरसमज नको. मी सभागृहाला ही बाब देतो.

**जयंत पाटील :-**

साहेब, मी ती नोटीस वाचली.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

ती नोटीस नाही. ते जे इन्डीपेंडन्ट परवानगी देत होते ते मा. आयुक्त साहेबांच्या मान्यते नंतर देण्याचे निर्णय झालेले आहे. त्यांनी रीकमेन्डेन्ट केलेली फाईल आहे. त्यांना डावलून कोणतीही परस्पर फाईल होणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

म्हणजे प्रशासनाचा त्यांच्यावर विश्वास नव्हता का? तुम्ही सहीचे अधिकार काढले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

सहीचे अधिकार काढले हा शब्दप्रयोग तुम्ही करु नका.

**जयंत पाटील :-**

पूर्वी फाईल आयुक्त साहेबांकडे जात नव्हती.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

फाईल पूर्वी जात होते. काही फाईल त्यांच्या निदर्शनास नव्हत्या. वास्तविक आहे की, तो विषय डायरेक्टली प्रशासकीय डील ही मा. आयुक्त साहेबांकडे आहे आणि पाणी पुरवठा विषय आहे. एखादे टेक्नीकल एक्सपर्ट ज्यावेळेस निर्णय घेतात. मा. आयुक्त साहेबांना वाटले असेल की, भविष्यामध्ये कॉम्प्लीकेशन होऊ नये. इलेक्शनचे दिवस आहेत. पारदर्शकता असावी.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, चुकीचे आहे. आपण मला एक सांगा की, मा. आयुक्त साहेबांना एवढा मिरा भाईंदरचा चार्ज दिलेला आहे. आज आपली पालिका एवढी पसरली. आपल्याला डेव्हलपमेन्टची कामे करायची आणि आपली मंत्रालयामध्ये नेहमी मिटींग असते. साहेब, नेहमी मंत्रालयामध्ये असतात. तर एवढ्या लहान - लहान पाणी कनेक्शनच्या कामासाठी वेळ कधी मिळेल.

**हंसुकुमार पांडे :-**

वेळेवर फाईल पास होणार नाही ना आणि साहेबांकडे आमचीच फाईल किती दिवसापासून पडलेली आहे.

**ज्युडी डिसोझा :-**

पाण्याची फाईल ही वॉटर डिपार्टमेन्टमध्ये असेच पडलेले आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

आता, सही होतच नाही तिकडे कमिशनर साहेब राहत नाही. मंत्रालयात आहेत तर ते काम कसे होणार?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब पाणी कनेक्शनवर सही करणे हे शुल्लक काम आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

ते सगळ्या फाईल स्टडी थोडेच करणार आहेत?

**जयंत पाटील :-**

आज आम्हाला एखादा पाण्याविषयी विचारायचा असेल तर आम्ही मा. आयुक्त साहेबांना बोलवू का?

**मा. सभापती :-**

मी मा. आयुक्त साहेबांशी चर्चा केली आहे.

**जयंत पाटील :-**

त्याच्यात तो पारदर्शक आहे. तुम्ही ते फाईल अे.टी.पी. पाठवता टॅक्सला पाठवता. हे सगळे रेकॉर्डमेंट झाल्यानंतरच सही करतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

जे इन्डीपेंडन्ट कार्यकारी अभियंतांना अधिकार होतो त्यात ते कर्टेल करुन मा. आयुक्त साहेबांच्या मंजुरीशिवाय करु नये. असे आदेश काढले गेले आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब, पहिले काम बरोबर होते. मा. आयुक्त साहेबांना हातात घेऊन.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब कालच्या प्रभाग समितीच्या सभेमध्ये सुध्दा आमच्या कॉंग्रेसच्या व सगळ्या सदस्यांनी असा जोर धरला होता की, सह्यांचे जे अधिकार काढले होते की, मा. कमिशनर साहेबांनी सांगितले होते की ............

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

ही बाब मी मा. आयुक्त साहेबांसमोर चर्चा करतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हो. आता सुध्दा साहेबांना असे सांगा की, स्थायी समितीच्या सर्व सदस्यांनी सांगितले आहे. एवन कॉंग्रेस, बीजेपी इ. सर्व सदस्यांनी सांगितले आहे. साहेब, सगळ्यांची ही डिमांड तर तुम्ही ॲक्सेप्ट करावी.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

ही बाब मी मा. आयुक्त साहेबांच्या निदर्शनास आणतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, थँक यु.

**रतन पाटील :-**

साहेब, मा. आयुक्त साहेबांना वेळ असेल तर त्या विषयावर बोलावून घ्या.

**जेन्वी अल्मेडा :-**

साहेब, फक्त प्लॅबींग ऑर्डर द्यायची आहे आणि १० दिवस झाले, फाईल पेन्डिग आहेत.

**मा. सभापती :-**

करतील.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सभापती साहेबांवर आमचा विश्वास आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

मा. सभापती साहेब आणि आम्ही दोघेही या प्रकरणावर चर्चा करु.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. उपायुक्त (बालाजी खतगावकर) साहेब नेहमी जे कमिटमेन्ट करतात फुलीफल करतात. कारण त्यांनी भरपुर कमिटमेन्ट आणि भरपुर फुलफिल केलेली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

ह्या कमिटमेन्ट माझ्या नावे टाकली जातात. ज्या फुलफिल होत नाही.

**शशिकांत भोईर :-**

नाही साहेब, तुम्ही असा ठराव करायला नको पाहिजे होता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

असा ठराव करता येत नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब, तुम्ही ते मा. आयुक्त साहेबांबरोबर बोला.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ह्याच्यामध्ये फक्त शेवटचे विचारतो की, 'ड' आहे ९९४.९० आणि त्याच्यामध्ये ४२२.६१ जमा झालेले आहे तर ते ५७२ जरा डीफरन्स जरा जास्त वाटतो. प्रत्यक्ष जमा 'अ'....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

मी दलित वस्ती, विधी आयोग ह्यामधले मी हेड वाचले आहे.

(सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. १३७ च्या ठरावाचे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १३७:-**

वार्षिक जमाखर्चाचा आढावा घेणेबाबत.

**ठराव क्र. १४१ :-**

सन २००५-०६ चा वार्षिक जमा / खर्च मा. स्थायी समिती समोर माहितीकरिता सादर करणेत आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा / खर्च व प्रत्यक्ष जमा / खर्चाचा आढावा घेवून आजची सभा सन २००५-०६ च्या वार्षिक जमा / खर्चास अवलोकनास मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्री. शशिकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(श्री. श्रीकांत मोरे यांनी प्रकरण क्र. १३८ चे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, अर्थसंकल्पीय तरतूद 'अ' मध्ये १०,५७०.१६ लाख रु. आहे. त्यामध्ये आपण घरपट्टी ४००० लाख रु. ठेवलेले आहे. जकात ६,३८२.५२ रु., जाहिरात कर २५ लाख रु. विशेष शिक्षण कर ९४.६२ लाख रु., पे ॲण्ड पार्क १० लाख रु. व होल्डिंग्जची ५० दिलेले आहेत. आता हे जे मी मुख्य हेड सांगितले आहेत. त्याची सहा महिन्यामध्ये आजपर्यंत किती वसूली झाली. आपण त्रैमासिक जेव्हा अहवाल सादर केला. १ एप्रिल २००६ ते ३० जून २००६ पर्यंत आपली एकूण वसूली १४९७.३९ लाख रु. झालेली आहे. आणि १ जुलै ते ३० सप्टेंबरची वसूली २ हजार ७९.६९ रु. झालेली आहे. आता मी मुख्य हेड सांगितले की, घरपट्टी आपण त्यावेळी किती वसूली केली.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

सप्टेंबर पर्यंत घरपट्टी ४४४.१५ आहे ते कॉलम ७ मध्ये दिलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

आणि जकात?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

जकात ३,१०१.७०.

**शशिकांत भोईर :-**

जाहिरात कर?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

जाहिरात कर २ लक्ष ४८ हजार रु., विशेष शिक्षण कर १३ लक्ष ९२ हजार रु., होल्डिंग्ज ९ लक्ष ५१ हजार रु. वसूल केले.

**शशिकांत भोईर :-**

त्याचप्रमाणे 'ब' अर्थसंकल्पीय तरतूद आहे. एकूण ६२३.६२ अग्नीशमन सेवा कर व फी आपण ९४.६२ दाखवलेली आहे. अग्निशमन कॅपिटेशन फी ५० लक्ष रु. मार्गस्थ फी ४७५ लाख दाखवलेली आहे. तर आजपर्यंत अग्निशमन सेवा कर फी किती वसूली झालेली आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

अग्निशमन सेवा कर १३ लक्ष ८७ हजार रु. वसूल झालेले आहे. अग्निशमन कॅपिटेशन फी ७ लक्ष ७१ हजार रु. वसूल झालेले आहेत. आणि अग्निशमन परवान्यामध्ये ६३ हजार रु. जमा झालेले आहेत. मार्गस्थ फी अजून कार्यान्वित झालेली नाही. कारण, त्यामध्ये जागा निश्चितीचा आपल्याला मुख्य प्रॉब्लेम आहे.

**शशिकांत भोईर :-**

जागा निश्चित केल्याप्रमाणे शासनाची पण मंजूरी नाही ते खरं आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

नॅशनल हायवेशी आमची चर्चा चालू आहे. त्यांची एन.ओ.सी. घेऊन आपल्याला कार्यान्वित करायची आहे.

**शशिकांत भोईर :-**

अग्निशमन कॅपिटेशनची बरीच कमी आहे. आपण सहा महिन्यांमध्ये गेलो तरी १४ लक्ष रु. होऊ शकते. आपण सहा महिन्याचा अंदाज घेतला तर ७.७१ होते. आणि ५० लाख रु. ची तरतुद केलेली आहे. त्यांना कमी वसूली भरण्याचे कारण काय?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

घरे कसे बांधकाम परवानगीच्या आधारे आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

त्या वर्षामध्ये त्या महिन्यामध्ये किती परवानगी आपण देतो आणि आपण त्याचा विकास करासोबतही फी घेतो?

**शशिकांत भोईर :-**

विकास कर तो बऱ्याचसा अनधिकृत बांधकाम बरीच चालू आहेत. मग त्यांनी का घेतली नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

मी सर्व सन्मा. सदस्यांना माहिती देऊ इच्छितो की, कंम्प्लीशन सर्टिफिकेटच्या वेळेस ही फी घेत जात होती. तर ही बाब अभ्यास करुन आमच्या निर्दशनास आल्यानंतर बऱ्याच कारणास्तव कंम्प्लीशन सर्टिफिकेट न घेता रेसिडेंटल वापर सुरू होतो ही परिस्थिती होऊन आपला उत्पन्न कमी होऊ नये म्हणून मा. आयुक्त साहेबांशी कनवेन्स करुन आम्ही हे आदेश काढून घेऊन त्या विभागाला दिलेले आहेत. आणि बांधकाम परवानगी प्रारंभीच्या वेळेसच ही फी यापुढे वसूल करण्यात येत आहे.

**शशिकांत भोईर :-**

कधीपासून?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

कधी ऑर्डर आली?

**मा. उपायुक्त (श्री. संभाजी पानपट्टे सो.) :-**

३ महिने झाले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

३ महिने झाले. तर, माझी आपल्याला विनंती अशी राहीलं की, यापूर्वी ज्या बांधकाम परवानगी दिलेले आहेत. त्याचा एक तक्ता घ्यायचा इयरवाईजचा आणि त्याची डीफरन्स रक्कम सर्व विकासकाला तुम्ही मागणी करायचे म्हणजे जेणेकरून आपला मागचा एरियस सुद्धा क्लिअर होईल.

**शशिकांत भोईर :-**

ज्यांनी अशी फी भरली नसेल, अशांचे नोटीसा काढा व त्यांचे प्लॅन जर मंजूरीसाठी असेल तर थांबवा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

प्लॅन मंजूर झालेले आहेत.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, घेवारे साहेबांना तुम्ही असे आदेश द्या.

**मा. उपायुक्त (श्री. संभाजी पानपट्टे साो.) :-**

आपले जे ठराव झालेले आहेत तर तेव्हा पासून आता आपल्याला करता येईल.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तुम्ही घेवारे साहेबांना आदेश द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

या वर्षाची तरी पूर्ण करा.

**तुळशीदास म्हात्रे :-**

साहेब, ठराव कधी झालेला आहे?

**पानपट्टे :-**

साहेब २ वर्ष झालेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

ह्याला कोणीही नाही म्हणणार नाही. ही नियमाप्रमाणे देणारी फी आहे.

**शशिकांत भोईर :-**

मी मध्यंतरी सुद्धा पत्र दिलेले त्यांना की,.....

**बालाजी खतगांवकर (मा. आयुक्त (मु.) साो. ) :-**

साहेब, तिथे लोक राहतात.

**जयंत पाटील :-**

साहेब, बिल्डर भोगवटा दाखला का घेत नाही किंवा आपल्याकडून का दिला जात नाही ह्याची काही कारणे आहेत. आपल्या प्लॅनप्रमाणे बांधकाम नसते, ज्यांचे जर पार्किंग असेल तर ते कवर केले जाते आणि आपले ए.टी.पी. चे अधिकारी ज्यावेळेस चेकिंगला जातात. त्यावेळेला आपल्या नियमाचे उल्लंघन केले जाते म्हणून आपण भोगवटा दाखला देत नाही, हे एक त्यामागचे कारण आहे. तुम्ही जर भोगवटा दाखला अगोदर दिला तर तिकडे अनधिकृत बांधकाम होणारच आणखी एक माळा वाढेल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

आमचा उद्देश एकच आहे की, आपण अग्निशमन फॅसिलिटी सर्व शहरवासियांना देतो.

**जयंत पाटील :-**

साहेब, तो वेगळा भाग आहे. भोगवटा दाखला आणि त्याचा......

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

अग्निशमन फी आहे ना....

**शशिकांत भोईर :-**

अग्निशमन फी आपण कॅपेटेशन फी वर बोलतो.

**जयंत पाटील :-**

आपण भोगवटा दाखल्याबद्दल बोलत आहोत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

आपल्याला भोगवटा दाखला देता येणार नाही. पण, माझी अपेक्षा ती रिबीट टॅक्स वसूल करायला काय कारवाई. रिसपॉन्स देणार नाहीत. पण, प्रयत्न करायला काही हरकत नाही.

**शशिकांत भोईर :-**

आपण विकास कर्त्यांचे नकाशे मंजूर करायला जर थांबवले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

आपण भोगवटा दाखला देऊ शकत नाही. फक्त ती कंपाऊडींग फी वसूल करायला काय हरकत आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्हाला जर भोगवटा दाखला द्यायचा असेल ना, ज्याने अनधिकृत बांधकाम वाढीव केलं असेल तर त्याला पेनल्टी लावा, तर आपल्या उत्पन्नात आणखीन वाढ होईल.

**शशिकांत भोईर :-**

आपल्या मुंबई महानगरपालिकेमध्ये डबल टॅक्स लावला जातो. म्हणजे येथे एक रुपया घेतला तरी तिथे दोन रुपये घेतात. ज्यांनी भोगवटा दाखला घेतला नसेल अशा बिल्डींग्सना डबल फी घरपट्टी वसुल करायचे. तो आपोआप घेईल. कारण तो भुर्दंड त्या रहिवाशांवर पडेल आणि जिथे भोगवटा दाखला आला असेल अशाच बिल्डींगमध्ये घर घेईल. मग, तुम्ही त्यांच्या निदर्शनास आणून द्या ना. हा ठराव चांगला आहे. कमीत कमी आपली कॅपिटेशन फी भरेल.

**मा. सभापती :-**

त्याच्यात आपले वाढेल ना.

**शशिकांत भोईर :-**

रस्ते बनवायचे असतात. त्यांनी कच्चा रस्ता बनवून द्यायला पाहिजे. गटाराची व्यवस्था त्यांनी करायला हवी होती. ती आपल्याला करायला लागतात. भुर्दंड आपल्यावर पडतो. त्यामुळे आपले बजेट रखडत आहे.

**जयंत पाटील :-**

साहेब, विषय निघाला म्हणून सांगत आहे की, या ए.टी.पी. मध्ये एवढा गोंधळ चाललेला आहे. येथे ए.टी.पी. चे अधिकारी कोण आहेत?

**शशिकांत भोईर :-**

बोलवा त्यांना. मा. सभापती साहेब, आपल्या निदर्शनास आणून देतो की, आपल्या डी.सी. रुल आहेत. त्यामध्ये सरळ आहे की, असे जे कोणी आर्कीटेक असतील त्याला ब्लॅकलिस्ट मध्ये टाकायचे. तो जर अशी परवानगी देत असेल आणि पूर्ण काम केले नसेल तर ब्लॅकलिस्टमध्ये टाकु शकतो.

**मा. सभापती :-**

टाकु शकतो.

**एस. ए. खान :-**

कमीत कमी आपले उत्पन्न बुडू नये यासाठी काही कृत्य करावे लागतील. तसेच अग्निशमन कर, विकास कर भरला आहे की, ते सर्व बघायला लागेल ना.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपले आर्थिक नुकसान होत आहे की नाही?

**मा. सभापती :-**

आपले आर्थिक नुकसान होत आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. चव्हाण साहेब, ह्याचे उत्तर की, देऊ शकता का? आपण निवेदन करु शकता का? आम्ही आता जो भोगवटा दाखला देण्याबाबतचा प्रश्न विचारला आहे आणि जे काही निकष आहेत तर तुम्ही ज्यांनी घेतली नाहीत त्यांना डबल घरपट्टी टॅक्स लावणार का? तर, तुमच्याजवळ ती मंजुरी असते. ज्यांनी भोगवटा दाखला घेत नाही, त्यांच्यावर आपण अशी कारवाई करु शकतो का?

**पाणपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आम्ही नाही करु शकत.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही करु नका. पण तुम्ही आदेश देऊ शकता ना. की, घरपट्टी टॅक्स लावताना डबल लावा.

**चौहाण :-**

टॅक्सवाले करतात.

**मा. सभापती :-**

टॅक्सवाले करतात. तर तुम्ही कारवाई करु शकता का?

**अजित पाटील :-**

महानगरपालिका कायद्यामध्ये इललिगलला ज्यादा टॅक्स लावतो. बॉम्बे म्युनिसिपाल्टीमध्ये आम्ही चौकशी केली होती की, असे कुठे कम्पलसरी आहे का? की, इललिगल असेल तर ज्यादा टॅक्स लावा.

**शशिकांत भोईर :-**

मुंबई महानगरपालिकेत घेतले होते असे मी १५ दिवसांपूर्वी बातमीमध्ये ऐकलं होतं. आणि स्वतः मा. महापौर बोलले होते.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौरांनी वक्तव्य केले होते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

परवानगी घेऊन नंतर कम्पीशन्स घेऊ शकत नाही. सन्मा. सदस्य पाटील साहेब यांच्या बोलल्याप्रमाणे त्यांचे काही त्रुटी असतात म्हणून ते फुलफिल करु शकत नाही आणि आपण देऊ शकत नाही. पण अशा प्रमाणात इरेग्युलर त्याचे वास्तव्य चालूच असते. म्हणून आपले जे देय रक्कम त्यांच्याकडून येणे जे अपेक्षित असते ते मुंबई कार्पोरेशमध्ये डबल घेतले जातात. अनधिकृत ठिकाणी असे सन्मा. सदस्याच्या सुचना आहेत हे आपण तपासून घ्यायला हरकत नाही. माहिती घ्या.

**तुळशीदास म्हात्रे :-**

पण, ह्याच्यामुळे काय होत? नेमके चार माणसाकडून ठराव पास केला असेल, तर ते...

**जयंत पाटील :-**

मा. सभापती साहेब आपण मागच्या वेळेस ह्याच्यासाठी सभा तहकूब केली होती. एखादी स्थायी समितीची सभा जेव्हा लागेल. तेव्हा हे अधिकारी मंत्रालयात, कलेक्टर ऑफिस इकडे-तिकडे....

**मा. सभापती :-**

कोणीही अधिकारी मंत्रालयात जाणार नसतील आणि जागेवर बसतील. आपण चर्चा प्रत्यक्ष केली.

**जयंत पाटील :-**

आता, खरोखर मंत्रालयात गेले की संत्रालयात ते काही माहित नाही. सभेला यायचं नाही. इकडे केलेल्या भानगडी इकडे ऐकायच्या नाहीत. ए.टी.पी. ला प्रचंड प्रमाणात भानगडी आहेत.

**मा. सभापती :-**

घ्याना मग.

**जयंत पाटील :-**

ए.टी.पी. ला टी.डी.आर. देताना एवढा गोंधळ केलेला आहे. आणि रजिस्ट्रेशन झालेले नाही.....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

मंत्रालयात जर बैठक असेल तर ते जाऊ शकतात. बेठक नेसल तर सभेच्या टाईमात .........

**जयंत पाटील :-**

तुम्ही मा. सभापती यांना पत्र द्या ना. त्याला जोडून की, आज बैठक असल्यामुळे मी येऊ शकत नाही.

**मा. सभापती :-**

त्याचा खुलासा करा. जर ते गेले असतील सचिवांना नोटिस येत असेल .........

**जयंत पाटील :-**

त्यांनी मागच्या मिटींगला ठाण्याला आहेत असे सांगितले होते. त्यावेळेसही ते नव्हते.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, आपणच निर्देश द्यावेत करा की, जे कोणी मा. अधिकारी कारण नसतानाही गैरहजर राहिले तर आपली सभा तहकुब करावी. तसेच जे अधिकारी मंत्रालयात, जिल्हाधिकारीच्या मिटींगमध्ये किंवा अन्य कोठेही त्या मिटींगमध्ये पत्र असणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :-**

पत्र असले पाहिजे. पुरावा दाखवायला पाहिजे. बरोबर आहे. कोणीही अधिकारी असू दे इंटिमेशन द्यायला पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

तसेच, अर्थसंकल्पीय तरतूद 'क'मध्ये आहे. एकूण २,१०३.६२ लाख रु. आहे. आपण त्याच्यामध्ये बाजार लिलाव व बाजार फी २५० लाख रु. दाखवलेले आहेत. आणि रस्ता नुकसान भरपाई १५० लाख रु. दाखवलेले आहेत. टेंडर मालमत्ता ट्रान्सफर फॉर्म फी ५० लाख रु. व इमारत परवाना फी, विकास आकार बाल्कनी बंदिस्त फी १२०० लाख रु. दाखवलेले आहे. विशेष हस्तांतर फी ५० लाख रु. आणि कारखाने, दुकाने, आर्किटेक्ट फी २०० लाख रु. दाखवलेले आहेत. तर, आजपर्यंत ह्यामध्ये किती वसूली झाली आहे? याबद्दल मला खुलासा द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

बाजार फी आणि बाजार लिलावामध्ये ११०.८० लक्ष रु. वसूल झालेले आहेत. वाचनालय फी ३०,००० वसूल झालेले आहेत. रस्ता नुकसान भरपाई मध्ये ७ लक्ष ७ हजार रु. वसूल झालेले आहेत. इमारत परवाना फी व विकास कर मध्ये ३६३.८८ लाख रु. वसूल झालेले आहेत.

**शशिकांत भोईर :-**

टेंडर फॉर्म मालमत्ता ट्रान्सफर फी किती वसूल झालेली आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यामध्ये १७ लक्ष ५८ हजार रु वसूल झालेली आहे?

**शशिकांत भोईर :-**

विशेष हस्तांतरण फी किती वसूल झालेली आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यामध्ये १९ लाख ९० हजार रु. वसूल झालेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

कारखाने, दुकाने, आर्किटेक्ट फी किती वसूल झालेली आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कारखाने, दुकाने, आर्किटेक्ट १२ लाख ८५ हजार रु. वसूल झालेली आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपली सहा महीन्यांमध्ये जी उर्वरित शिल्लक राहिलेली रक्कम आहे, ती वसूल होईल का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आम्ही जास्तीत जास्त रक्कम वसूल करण्याचा प्रयत्न करू.

**शशिकांत भोईर :-**

त्याच्यासाठी प्रशासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण निश्चित प्रयत्न करू.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, दुसरे 'ड' मध्ये, अर्थसंकल्पीय तरतूद १३५८.८९ आहे. मुद्रांक शुल्क अनुदान १०० लाख रु. आहे. महागाई भत्ता ९२ लाख रु. आहे. आमदार - खासदार फंड १०० लाख रु. आहे. रस्ते बांधणी व त्यांचे परिक्षण ४० लाख रु. आहे, दलित वस्ती अनुदान १०० लाख रु. आहे, वित्त आयोग अनुदान १९५ लाख रु. आहे, डॉ. आंबेडकर वाल्मिकी आवास योजना ५० लाख रु. आहे. ह्यामधील आजपर्यंत आपल्याकडे किती जमा झाले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्यामध्ये तुम्हाला सांगत आहे की, शिक्षण कर रिबीट.......

**शशिकांत भोईर :-**

मुद्रांक शुल्क अनुदान दाखवा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नाही, ते अजून मिळालेले नाही. ते मार्च पर्यंत मिळतील.

**शशिकांत भोईर :-**

अच्छा, महागाई भत्ता किती जमा झालेले आहेत?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याला शिक्षण कर रिबेट रु. ९२ हजार मिळालेले आहे. आपल्याला महागाई भत्ता ४० लक्ष ३९ हजार मिळालेले आहे. आमदार फंड रु. ३५ लक्ष ८२ हजार प्राप्त झालेले आहे. रोड ग्रांट ९४ लक्ष ९७ हजार रु. प्राप्त झालेले आहे. दलित वस्ती अनुदान ९९ लक्ष ९० हजार रु. प्राप्त झालेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

याचा अर्थ आपले बजेट पूर्ण झालेले आहे. वित्त आयोगाची रक्कम प्राप्त झालेली आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

वित्त आयोगाची सप्टेंबर महिन्यांची रक्कम प्राप्त झालेली नाही.

**शशिकांत भोईर :-**

वित्त आयोगाची थोडीसुद्धा रक्कम प्राप्त झालेली नाही का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कालपर्यंत वाल्मिकी आंबेडकर योजनापर्यंत कोठलेही रक्कम प्राप्त झालेली नाही. पल्स पालिओसाठी रु. ५ लक्ष २९ हजार पर्यंत प्राप्त झालेली आहे.

**शशिकांत भोईर :-**

हेच मुख्य हेड होते. अर्थ संकल्पीय 'इ' मध्ये एकूण तरतूद ३७५ लक्ष. प्वॉइंट गुंतवणूकीवरील व्याज व इतर व्याज यांच्यावर किती रक्कम मिळाली ते सांगा?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सप्टेंबर अखेर ५४ लक्ष १४ हजार रु. रक्कम प्राप्त झालेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

इतर किरकोळ जमा किती प्राप्त झालेले आहेत?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मनपा गुंतवणूकीवरील इतर रक्कम व इतर व्याज मिळून अमाउंट दिलेली आहे.

**शशिकांत भोईर :-**

इतर किरकोळ जमा रक्कमसुद्धा दिलेली आहे. आपण बजेटमध्ये ती अमाउंट २५ लक्ष ठेवलेली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यामध्ये ५ लक्ष ३१ हजार रु. जमा झालेले आहेत.

**शशिकांत भोईर :-**

कचरा निधी व शुल्क किती प्राप्त झालेले आहेत?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

३ लक्ष ३९ हजार रु. जमा झालेले आहेत.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तिकडे हॉस्पिटल खुप आहेत. एवढे ३ लक्ष ३९ हजार रु. कसे झाले? आता हे सर्व बायो हॉस्पिटल एवढी आहेत की रोजचा कचरा काढतात. त्यामुळे त्यांना हा कर कमी आलेला आहे. हॉस्पिटलने रेट कमी दाखवलेला आहे का? डॉक्टरसाहेब, ह्याचा खुलासा करायचा आहे?

**रुंदन राठोड :-**

कशाचा खुलासा करायचा आहे?

**शशिकांत भोईर :-**

हा जो कचरा विल्हेवाट शुल्क आहे......

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी तुंम्हाला सांगतो की, आरोग्य विभाग केस पेपर ४ लक्ष ३६ हजार दोन येणार......

**शशिकांत भोईर :-**

साहेब, मला कचरा विल्हेवाट शुल्क आहेत. आणि जे हॉस्पिटल आहेत त्यात जे शरिराचे अवयव आहेत. त्याचे विघटन करण्यासाठी वसईला बायो मेडिकलमध्ये नेतात. तर, आपल्याकडे एवढे हॉस्पिटल आहेत. तर हॉस्पिटलवाल्यांनी बेड कमी दाखवले का? आपण २५ लाख रु. ची तरतूद ठेवली आहे. आणि आपल्याकडे ३ लक्ष ३९ हजार रु. जमा झालेले आहे. मग, आपण सहा महिन्यांमध्ये आपले टार्गेट कसे पुर्ण करणार? याचा अर्थ मा. डॉक्टर साहेब, प्रत्येक हॉस्पिटलमध्ये जाउुन किती बेड आहे याची तुंम्हाला शहनिशा करावी लागेल. मा. सभापती सो. यांनी त्यांना असे निर्देश द्यावे. कारण, आपले २५ लाख रू. जरी पुर्ण झाले व एक - दोन नगरसेवकांच्या मानधनामध्ये मध्ये कमी होईल आणि आपल्याला ....... तसेच, प्रत्येकाला जे नगरसेवक निधी अनुदान मिळतात ते सुद्धा कमी पडेल, आपल्याला असे पैसे कमी पडले तर डॉक्टरवर वैद्यकीय आरोग्याचा चार्ज आहे, म्हणून त्यांना बोट दाखवतो आता, त्यांना करायचे आहे. १५ दिवसामध्ये त्यांच्यावर ते इमप्रुव्हमेंट करु शकतात. साहेब, हॉस्पिटल रजिस्ट्रेशन फी ३० लाख रु. आहे तर किती आली?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य यांना मी माहिती देउु इच्छितो की, आपण काही वेळा काही फिगर्स अपेक्षित सुद्धा ओव्हर साईज करतो. कदाचित तेवढी रक्कम होतच नाही. हे सुद्धा फॅक्ट आहे. म्हणून अशी परिस्थिती निर्माण होते. कचरा विल्हेवाट जे बायो मेडिकल वेस्ट आहे. त्याचे फिक्स रेट आहे. कचरा जास्तीचे करता येत नाही. जो होतो त्याच्यातलेच आपल्याला पैसे भेटतात.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, पण ते सुद्धा बेडप्रमाणे ठरवलेले आहेत. आपण, ते बेडच्या संख्येनेच घेतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

बरोबर आहे. शहरामध्ये दुर्गंधी पसरू नये. सर्व दवाखान्याचा वेस्ट सायंटीफिक पद्धतीने त्याचा डिसपोझल व्हावा, हा आपला उद्देश आहे. त्याच्यात इनकम व्हावा, हा आपला उद्देश नाही. म्हणून, आपण त्याला रॉयल्टी फार कमी ठेवलेले आहे. आणि ही सगळी फॅसिलिटी बाहेरची लोक करतात. माझ्या माहितीप्रमाणे आपण त्याच्यामध्ये काहीच करत नाही.

**रतन पाटील :-**

बाहेरची लोक ही फॅसिलिटी करतात का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हो, बाहेरची एजन्सी करते. सन्मा. डॉक्टर साहेब या ठिकाणी असून त्यांनी ह्यावर अजून काही कमेंट करावी. तसेच, बाहेरची एजन्सी त्यांच्या खर्चाने करतात. आपण फक्त एक मेडीएटर आहोत. वास्तविक की इन मेडिकल असोसिएशन आहे. ही सुविधा त्यांनी तयार केलेली असते. म्हणून, कदाचित हा हेड का वाढला असेल ते आपल्याला मा. सभापती सो. सांगू शकतील.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, आपल्याला येथे घट येते. म्हणून तुम्हाला दाखवतो. हॉस्पिटल रजिस्ट्रेशन फी....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

साहेब, काळजी घ्या. हॉस्पिटल रजिस्ट्रेशन फी वाढायला पाहिजे.

**रतन पाटील :-**

वाढवायला पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, किती वसूल झाली आहेत?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, असं वाटत ह्यामध्ये मा. सभापती सो. आणि माजी सभापती सो. हे चांगले उत्तर देतील. की आपण मागे जे कचरा विल्हेवाट शुल्क २५ लाख रु. ठेवली होती. आणि हॉस्पिटल रजिस्ट्रेशनची फी ३० लाख ठेवली होती. तर ते आपण एक्सपेक्ट काय केले होते. प्लानिंग काय केले होते?

**रतन पाटील :-**

कशासाठी? मा. माजी सभापती होते म्हणून?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हो. माजी सभापती त्यांनीच मंजूर केले होते ना मा. उपायुक्त सो. यांनी उत्तर दिले होते की, त्यावेळी आपले बजेट बनते त्यावेळी ह्या ज्या अपेक्षित अमाउुंट असतात. त्यामध्ये, काही सदस्य असतात. ते वाव सुचवतात आणि १० लाख रु.चे १५ लाख होतात.

**तुळशीदास म्हात्रे :-**

का सुचवावे लागले? कारण उद्या एका वर्षात चार हॉस्पिटल तयार होणार नाहीत का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापतींनी उत्तर दिलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापतींनी उत्तर दिलेले आहे. पण, वसूली कमी आलेली आहे ना. याचा अर्थ त्यांनी रजिस्ट्रेशन फी घेतलेली नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

हा वसूली करणे. आपला जन्मसिद्ध हक्क आहे.

**शशिकांत भोईर :-**

मग, रजिस्ट्रेशन घेतले नसतील.

**तुळशीदास म्हात्रे :-**

घरपट्टी किती वसूली होते, हे जाउुन बघा. घरपट्टी भरायला १० वेळा लोक येतात आणि परत जातात. कारण, अधिका-यांना टाईम नसतो. ते मिटींगला जातात. काल इथे अधिकं-यांची कुठली मिटींग होती?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रदर्षन मिटींग घेतलेली होती.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मग, त्यासाठी वाघसाहेबांना इकडे बोलवले होते का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हो.

**शशिकांत भोईर :-**

मा. उपायुक्त खतगांवकर सो. हॉस्पिटल रजिस्ट्रेशन परवाना फी अजुनपर्यंत किती आली आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हॉस्पिटल रजिस्ट्रेशन परवाना फी रु. १३ हजार आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, १३ हजार रु. चे आपण रु. ३० लाखाची तरतुद केली आहे. म्हणजे रु. १ लाख सुद्धा पूर्ण नाही. याचा अर्थ हॉस्पीटल जे डॉक्टर आहेत ते रजिस्ट्रेशन केले नाही की काय?

**रतन पाटील :-**

आपल्याकडे ८० लाख रु.ची तरतुद आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मा. डॉक्टर साहेब आपण आता नवीन चार्ज घेतलेला आहे. पण, आधीच्या डॉक्टराकडून माहिती घ्या ना. आपण किती हॉस्पिटलची पाहणी केली? किती हॉस्पिटल चेक केले. आतापर्यंत एकही हॉस्पीटल चेक केले नसेल, अशी १०० टक्के खात्री देऊन मी बोलतो. आपले रेट कसे वाढणार? त्याच्यात जरा इंटरेस्ट घ्या. आपल्या भाईंदरमध्ये हॉस्पिटल किती आहे. त्याची जरा शहानिशा करा.

**मा. सभापती :-**

तुम्ही जरा चौकशी केली का?

**रतन पाटील :-**

साहेब, ह्यावरुन असे स्पष्ट होते की, बजेटच्या वेळेला बजेट वाढवलं जातं. आणि जे अमाऊंट ठरवलेले असते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, गेल्या वेळेला तुळशीदास म्हात्रे साहेबांनी बजेट वाढवले होते.

**रतन पाटील :-**

वसूलीपेक्षा खर्च जास्त होतो हे नक्की आहे. कारण आपण जी वसूली ठरवतो, ती वसूली होत नाही. खर्च तेवढाच होतो.

**शशिकांत भोईर :-**

मा. उपायुक्त (मा.) साहेब ती रजिस्ट्रेशन फी आहे ना, त्याच्यात जर साहेबांना लक्ष द्यायला सांगा. प्रत्येकाला नोटीसा पाठवा. ज्यांनी रजिस्ट्रेशन केले नसेल त्यांना नोटिस पाठवा.

**रतन पाटील :-**

साहेब, खर्च डबल होतो.

**शशिकांत भोईर :-**

आपली वसूली होईल ना.

**रतन पाटील :-**

साहेब, वसूलीवर जोर मारा. आपल्या सगळ्या अधिका-यांना प्रत्येक विभागातील वसूली झाली पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आरोग्य विभागाबद्दल आपण जी मागे बैठक घेतली होती. त्याचे श्री. चिंतामण शिंदे साहेब काम करतात. हे पूर्ण शहरातले वेगवेगळे इंटरप्राईज जे आपल्याला आरोग्य विभागाखाली रजिस्ट्रेशन करणे अपेक्षित आहे. त्याचा डिटेल सर्व्हे करुन जे अन्न निरीक्षक वगैरे आपल्याकडे आहेत. तर त्या माध्यमातून सर्व वर्गीकरण व्यवसायाचे रजिस्ट्रेशन आपल्याकडे होणे अपेक्षित आहे. सर्व खानावळी आरोग्य.....

**तुळशीदास म्हात्रे :-**

पानपट्टीच्या ज्या टपऱ्या आहेत ना. त्या गटारावरती आहेत. त्यांच्याकडून सुद्धा चार्ज वसूल करा ना.

**रतन पाटील :-**

साहेबांना सांगितलेलं आहे. त्यांच्यावरती लायसन्स फी आकारा. मा. उपायुक्त साहेब, याला थोडेसे प्रोत्साहन द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

खतगांवकर साहेब, आपण आता बोललात की, महानगरपालिकेमध्ये फक्त दोनच उत्पन्न आहे. एक जकात कर आणि मालमत्ता कर आणि बाकीचे पाणी बिल आहे. आपली पाणीपट्टी यामध्ये जाते. पण साहेब, आपल्या महानगरपालिकेमध्ये आणखी भरपूर सोर्स आहे की, आपण जे लोकांकडून घेऊ शकतो. परंतु, आपण ते घेत नाही. आपल्या प्रशासनाकडून ते तारंबळ आहे.

**मा. सभापती :-**

ते सोर्स कुठले कुठले आहेत?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, हॉटेल परवाना फी आहे, लायसन्स फी आणि घरदुरूस्ती फी आहेत. अशा भरपूर आहेत. परंतु, जाचक अटी असल्यामुळे, कोणीही माणूस महानगरपालिकेला अप्रोच होत नाही. साहेब, कालची गोष्ट सांगतो की, आपले सन्मा. सदस्य हे आपल्या महानगरपालिकेचे नगरसेवक आहेत. त्यांच्या मित्राचे हॉटेल होते. आणि तो हॉटेल मालक परवानगी घ्यायला आला होता. तर आपल्या सन्मा. सदस्यांनी अन्ननिरीक्षक यांना सांगितले की, असा माझा मित्र आहे. तुम्ही जर लायसन्सचे काम करा. तर त्या माणसाने त्यांच्याकडून रु. १०,००० घेतले. असं सांगितले की, माझा रेट २०,००० रु. आहे. पण साहेबांनी सांगितले म्हणून रु. १०,००० घेतले. मग साहेब तुमच्याकडे लोक कशी येतील? आणि तुमचा रिव्हेन्यू कसा वाढेल? आता सन्मा. सदस्य शशिकांत भोईर हे बोलले की, त्यांनी ह्या बद्दल स्टडी केली. साहेब, मी तुम्हाला सांगतो की हा इनकम चा जो हेड आहे. तुम्ही ह्या हेडमध्ये भरपूर इनकम करु शकता. परंतु, आपल्या प्रशासनाकडे ते दिरंगाई होते.

**रतन पाटील :-**

साहेब, मोबाईल टॉवर्सला कर आकारणी करा. म्हणून किती वर्षापासून ओरडतोय. अजून पर्यंत कर आकारणी केलेली नाही.

**मा. सभापती :-**

अजून केली नाही का?

**रतन पाटील :-**

केली नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्याची प्रोसेस चालू आहे.

**एस. ए. खान :-**

मा. आयुक्त साहेब, मोठीमोठी दुकाने ही विदाउट लायसन्स ने चालतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मिसली जनक हे आपले हेड आहेत. त्याची या ठिकाणी चर्चा झाली. त्या अनुषगांने आवश्यक उपविधी होणे या ठिकाणी झालेले नाही. आम्ही तो विषय सर्व विभाग प्रमुखांनी मागच्या आठवडयात ठेवलेला होता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, हे उपविधी उपविधी....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ऐकून घ्या. आम्ही ते अंतिम केलेले आहेत. मा. सभापती साहेबांनी माझ्याशी चर्चा केली आहे. तर याबाबतचे मॅक्झिमम आम्ही पुढच्या बैठकीमध्ये उपविधी देऊन आम्ही ते अंतिम स्तरावर आणलेले आहेत. जेणेकरुन आपल्याला फिक्स सोर्स होईल. म्हणजे आपण चर्चा केल्याप्रमाणे, सर्व इंटरप्राइज रजिस्ट्रेशन व्हायला पाहिजे, दरवर्षी रिन्यूल व्हायला पाहिजे. त्यासाठी काही फी निश्चित व्हायला पाहिजे. मग, हातगाडया असो व्यवसायधारक असो, टेम्पररी व्यवसाय करणारे असोत, खानावळी असो, मेडिकल असो, दवाखाने असो, खूप मोठे कारखाने असो, त्या सर्वांचे रेग्यूलेशन करण्याचा आम्ही जे मॅन्यूअल तयार केलेले आहे. आम्ही थोडया दिवसांत ते आपल्यासमोर सादर करतो. आणि हे जे निश्चित सोर्स आहेत ते महानगरपालिकेसाठी आपण तयार करु.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आता सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील साहेब यांनी सांगितले की, एका माणसाला त्यांनी सांगितले की मी दुसऱ्याकडून २०,०००/- रु. घेतो. फक्त तुमच्याकडून १०,०००/- रु. घेतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याची नोंद घेऊन त्याच्याकडून नोटिस देऊन पुढच्या सभेत खुलासा करु.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मा. उपायुक्त साहेब जेवढे आपले उपायुक्त आहेत त्या सगळ्यांना घेवून तुम्ही मा. आयुक्त साहेबांसमोर जावून बसा. आणि त्यांना तुम्ही कडक वॉर्निंग द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. उपायुक्त सो. तुम्ही जे वक्तव्य केले अतिशय चांगले वक्तव्य केले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नोंद घेवून त्यांना सक्त ताकिद दिली जाईल. आणि त्याचे अनुपालन केले जाईल.

**रतन पाटील :-**

लवकरात लवकर ते करावे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. उपायुक्त खतगांवकर सो. तुम्ही जे आता वक्तव्य केले ते एखाद्या राजकीय नेत्यासारखे वक्तव्य केले. तुम्ही जे आश्वासन दिले. त्या आश्वासनाची पूर्तता होणार नाही, असे मला वाटते. साहेब, आज हॉस्पिटल रजिस्ट्रेशन फी तुमच्याकडे फक्त रु. १३,००० रु. आली आहे. आज रजिस्ट्रेशन फी किती आहे? आज भाईंदरमध्ये हॉस्पिटल किती आहे? साहेब, तुम्ही जर निघालात तर तुम्हाला दोन हाकेवर फक्त १३ हॉस्पिटल दिसतील. आज हॉटेल पावलोपावली आहे. हे तुमच्याकडे का येत नाही? कारण, तुमच्याकडे ते आल्यानंतर तुमच्या ज्या काही अटी आहेत आणि त्यांच्याकडे पेपर्स असतात. परंतु, तुमचे जे कर्मचारी आहेत ते करत नाहीत. आणि ते पैशाची डिमांड करतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तेच सांगतो. त्या अटी आपल्यासमोर येतील. आणि त्या मोजक्याच ठेवणार आहोत. आपल्या मान्यतेनंतर ते अंतिम होतील. आम्ही परस्पर त्या अटी निश्चित करु शकत नाही. उपविधी बोलण्याचा अर्थच आहे ते स्टॅण्डींग सभेत सादर होतील आणि महासभेत त्यावर अंतिम होईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आता मी तुम्हाला जे उदाहरण सांगितलं आहे, तुमच्या कर्मचाऱ्याने ते असं केले. त्या सन्मा. सदस्याचे नाव ही मी तुम्हाला सांगतो. श्री. केशव घरत असे त्यांचे नाव आहे. तुम्ही त्या सन्मा. सदस्यांना ही बोलवा. तुमच्या ॲन्टीचेंबरला बोलवा आणि त्या कर्मचाऱ्यालाही बोलवा आणि तुम्ही त्यांना स्पष्ट विचारा की, तुम्ही पैसे घेतले की घेतले नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

नगरसेवकांनी सांगितले तर, त्याच्यावर ताबडतोब कारवाई करा आणि त्यांना नोटीस देवू नका.

**मा. सभापती सो. :-**

दुसरा विषय घ्या.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, त्याच्यामध्ये जकात चुकवेगिरी, दंडात्मक वसूली रु. ५० लाख रु. दिले आहेत तर आजपर्यंत किती जमा झालेले आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

रु. ८५ हजार जमा झालेले आहेत.

**शशिकांत भोईर :-**

८५ हजार रु. आहेत साहेब, ५० लाख रु. आहे. साहेब, आपल्याला ४९ लाख १५ हजार रु. जमा करायचे आहेत. आता, एवढे कम्पलेंट येतात. लोकांनी डबल पैसे घेतले असेल तर, ते फक्त शेवटचे संकिर्ण आहे.

(सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी प्रकरण क्र. १३८ च्या ठरावाचे वाचन केले.)

**जेन्वी अल्मेडा :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**शशिकांत भोईर :-**

ठराव मंजूर झाला. पण, एकच फक्त शेवटचे आहे. आपण शाळा इमारतीचे भाडे ४५९ लक्ष रु. दाखवलेले आहे. मग आजपर्यंत किती झाली?

**लंच टाईम :- २.००**

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तर, त्यासाठी अध्यक्षतेखाली किंवा महापौर महोदयांना घेऊन आपण शिक्षणमंत्र्याला भेटलोत तर अजून त्याला चालना भेटेल. असे मी मा. सभापती महोदयाला सांगत होतो. करुन घेता आले पाहिजे. त्यात आपले पण योगदान राहिलं.

**मा. सभापती :-**

आपण प्रत्यक्ष भेट घेऊ या.

**जयंत पाटील :-**

पुढच्या आठवड्यात भेट घेवू.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रशासकीय अधिकारी आणि आपले दोन अधिकारी घेउन आपण जाउ.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, माझे कर्ज उभारणी होते. बी.पी. रोडचे आपण ४,८०० लाख रु. चे प्रोव्हीजन केले होते. भुयारी गटार नियोजनाचे ५००० लाख रु. केले. भाईंदर पूर्व-पश्चिम भुयारी मार्ग योजना रु. १०० लाख रु. आतापर्यंत सुरु झाली असती. आमच्या लोकांना खुप त्रास होतो. आम्हाला जर वेस्टला यायचे असेल तर एकतर पूल चढावा लागतो किंवा कुठल्या तरी पटरी क्रॉस करावी लागते. आपलं कुठेतरी चुकले साहेब. यासाठी आपण नोंद घेणार आहेते का? कधी कर्ज उभारणी घेणार आहोत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याबद्दल मी सभागृहाला माहिती देवू इच्छितो की, आपण रु. ४८ कोटी रु. पर्यंत रस्तेविकास कामासाठी एम.एम.आर.डी.ए. कडून कमी व्याजदराने निधी उभारतोय आणि तो प्रस्ताव आपल्या अंतिम टप्प्यामध्ये आहे. त्यासाठी आवश्यक असेलेली सी.डी.पी. वगैरे आपण तयार करुन त्यांना दिलेली आहे. संबंधित विभागाच्या आणि मा. आयुक्त साहेबांच्या बैठकासुध्दा झालेल्या आहेत. आणि उर्वरित जो भुयारी गटार योजनेचा भाग आहे, तो आपण केंद्र शासनाच्या माध्यमातून जवाहरलाल नेहरु अर्बन मिशन रेन्युअल मिशन जो कार्यक्रम आहे, तो प्रस्ताव आपल्या राज्यशासनाकडून रिकमेन्ड होत आहे. तर, त्यामध्ये आपल्याला केंद्र शासनाचे व राज्यशासनाचे पैसे मिळतील आणि आपल्याला आपला हिस्सा टाकावा लागेल. त्यात आपल्याला अनुदान भेटणार आहे. त्याच्यासाठी जो फंड लागणार आहे तो आपण उभा करणार आहोत. पण, रस्ते विकासासाठी आपण एम.एम.आर.डी.ए. कडून निधी प्रस्ताव आपण अंतिम टप्प्याला आणू.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, आपण आजपर्यंत आहे ना त्यामध्ये ६ महिन्यांचा जो अहवाल दिलेला आहे. त्याच्यामध्ये रु. २ लाख ९७ हजार रु. आपण आजपर्यंत निधी उभा केला आहे. कुठून व कशामधून निधी उभा केला आहे हे माहित नाही. तर, आपल्याला अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये भांडवली जमा रु. ११ हजार २८६.२२ लाख रु. आपण यात दाखवलेले आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

साधारणतः साडे तीनशे कोटी रुपयांचा प्रस्ताव आपण केंद्र शासनाच्या माध्यमातून कार्यन्वित करण्याचे प्रयत्न करतो आणि रु. ४८ कोटीचे एम.एम.आर.डी.ए. च्या माध्यमातून कर्ज निधी उभारण्याचे प्रयत्न करतो. आणि त्याच्या बैठका अंतिम टप्प्यात आलेल्या आहेत. आपण अपेक्षा करु की, मार्चपर्यंत एम.एम.आर.डी.ए. चे पैसे तरी आपल्याला भेटायला पाहिजेत.

**जयंत पाटील :-**

साहेब, खर्च आहे की अनुदान आहे?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

३४२ ते ३५० कोटी रु. मध्ये त्या योजनेचे निकष असे आहेत की, ५० टक्के रक्कम केंद्रशासन काही रक्कम राज्यशासन हे अनुदान आहे.

**जयंत पाटील :-**

हे अनुदान आहे का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हे अनुदान आहे. आपला १० टक्के, २० टक्के जो निधी आहे तो लोकल पार्टीसिपेटने आपल्याला उभा करावयाचा आहे.

**जयंत पाटील :-**

साहेब, जेसलपार्कला जो आपण भुयारी मार्ग काढणार होतो. म्हणजे भाईंदर ईस्ट ते भाईंदर वेस्टपर्यंत तो रेल्वे शासनाने रद्द केला आहे का?

**रतन पाटील :-**

त्या दिवशी यावर चर्चा झाली ना.

**मा. सभापती :-**

हो त्या दिवशी त्यासंदर्भात चर्चा झाली आहे.

**दिपक खांबित :-**

त्याच्यामध्ये त्यांनी असा प्रस्ताव दिला होता की, सब वे देखिल एक फुट बांधा म्हणून. तर तेथे कन्टीन्युव्ह ३ ते ४ फुट पाणी राहिल. तर आपण सांगितले की, ते शक्यच नाही. पुल बांधणे, कारण पुल बांधायचे असेल तर नारायण भुवन हॉटेलच्या पुढेपासून पुल बांधावा लागेल. आणि ती जागा कन्जस्टड होईल.

**जयंत पाटील :-**

तिकडून पुल जाणार नाही.

**दिपक खांबित :-**

तर आपण पुन्हा रिक्वेस्ट केली की, तुम्ही आम्हाला सबवे द्या. पाणी वगैरे यायला व जायला आम्ही चोविस तास पंप ठेवू. आणि काढू. तर ते मंजुरी देतील.

**जयंत पाटील :-**

पाण्याचा म्हणजे हा पावसाळ्याचा प्रश्न आहे ना.

**दिपक खांबित :-**

वॉटर लाईन समुद्राजवळ आहे ना तर पाणी कन्टीन्युव्ह राहिल. असं येत नाही. त्यांचे तसे म्हणणे आहे.

**प्रकरण क्र. १३८ :-**

त्रैमासिक जमा खर्चाचा आढावा घेणेबाबत.

**ठराव क्र. १४२ :-**

माहे जुलै २००६ ते माहे सप्टेंबर २००६ पर्यंतचा त्रेमासिक जमा / खर्च मा. स्थायी समितीसमोर माहितीकरिता सादर करणेंत आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च व अंदाजपत्रकीय जमा/खर्चाचा आढावा घेवून आजची सभा सन २००६/०७ च्या दुसऱ्या त्रेमासिक जमा/खर्चास मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. रतन पाटील.** **अनुमोदन :- श्री. जयंत पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १३९ चे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती सो. आपण जो आता सन २००७ ची दैंनदिनी व दिनदर्शिका छपाई कामी येणाऱ्या खर्चास पुर्नविनियोजन विवरण पत्रास मंजुरी देणाऱ्या बाबतचा घेतलेला त्याच्यामध्ये आपल्याला हा बदल करायचा आहे. आताच आपली सभा झाली आहे. आपली महापौरांच्या दालनात चर्चा झाली आहे. तेथे आपल्या निर्दशनास आणू इच्छितो की, आपण ह्या दिनदर्शिका छापलेल्या आहेत तर त्या किती छापलेल्या आहेत? कलरच्या किती व ब्लॅक ॲन्ड व्हाईट किती छापलेल्या आहेत?

**मा. सभापती :-**

यावर्षीच्या की पुढच्या वर्षीच्या सांगता?

**शशिकांत भोईर :-**

गेल्या वर्षीच्या दिनदर्शिकेबाबत सांगा. कारण बऱ्याच नगरसेवकांनासुध्दा ह्या दिनदर्शिका मिळालेल्या नाहीत.

**मा. सभापती :-**

जे झाले ते झाले मागच्या वर्षी सारखं या वर्षी होणार नाही.

**जयंत पाटील :-**

तुमच्या ३१ तारखेपर्यंत दिनदर्शिका हातात येतील.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आणि यावेळी नविन म्हणजे ब्लॅक ॲन्ड व्हाईट छापणार नाही. सगळ्यांना घरपोच येतील.

**रतन पाटील :-**

नगरसेवक प्रशिक्षण याच्यामधून ही तरतुद कमी होईल का? कारण तुम्ही याच्यातून जर फिरवत असाल .....

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, मी प्रशासनाची एक चुक दाखवतो. हा एक शेवटचा मुद्दा आहे. दैंनदिनी व दिनदर्शीका छपाई बाबतच्या पुर्नविनियोजनाच्या विवरण पत्रकास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम

१९४९ मधील अनुसुची ड प्रकरण क्र. ७ आहे. पण प्रकरण क्र. ७ पहिला येईल की ड पहिला येईल? याचा जरा प्रशासनाने खुलासा करावा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सभापती महोदयांच्या सुचना आहेत की, या प्रशिक्षण दौऱ्यामध्ये सदस्यांच्या को-ऑर्डीनेशनसाठी काही अधिकाऱ्यांच्या डेप्युटेशन व्हावे अशी त्यांची सुचना आहे. ही बाब मी मा. आयुक्त साहेबांकडे सुचीत करतो. म्हणजे त्यांच्यांशी चर्चा करुन निर्णय घेतला जाईल.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसुची ड प्रकरण क्र. ७ आहे. तर प्रकरण क्र. ७ पहिला पाहिजे की ड पहिला पाहिजे याचा जरा खुलासा करावा.

**रतन पाटील :-**

ती प्रिन्टीग मिस्टेक आहे.

**शशिकांत भोईर :-**

त्याचा कलम लिहलेला नाही.

**दिपक खांबित :-**

ड पहिला येणार.

**शशिकांत भोईर :-**

अनुसुची ड कसा परत येणार?

**दिपक खांबित :-**

अनुसुची ड मध्ये ते प्रकरण आहे.

**शशिकांत भोईर :-**

ठिक आहे मान्य करेन. साहेब, त्याच्यामध्ये कलम १ चा ड सुध्दा होउ शकतो.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पुर्नविनियोजन जे असतो ते स्थायी समितीपर्यंत असतो आणि डिपार्टमन्टच्या बाहेरचे असेल तर ते महासभेपर्यंत जातो.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, याच्यामध्ये लिहताना वाक्य रचना मागे पुढे झाली आहे हे माझ्या निदर्शनास आहे. तर आता मी कलम १ चा ड समजु की, ड चा १ समजु.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसुची जी दिलेली आहे. त्यामध्ये एकूण १९ प्रकरण आहे. तर अनुसुचि 'ड' आहे ते त्याचे टायटल आहे. म्हणून, इतर अधिकाऱ्यांनी जे नमुद केले आहे की, अनुसुची पहिले यायला पाहिजे. आणि अनुसुची 'ड' मधील प्रकरण - ७ आहे. त्याच्या अंतर्गत ही मान्यता आहे. अनुसुची प्रकरण ७ मधील जे पुनर्विलोकन आहे. त्या हेडखाली ते दिलेले आहे व त्याअंतर्गत मान्यता पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

प्रकरण ७ पुर्ण पकडायचा आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

हो. तो अर्थसंकल्प पुनर्नियोजनासाठी प्रकरण आहे.

(सन्मा. सदस्या जेन्वी अल्मेडा यांनी प्रकरण क्र. १३९ या ठरावाचे वाचन केले)

**ज्युडी डिसोजा :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठरावाची अंमलबजावणी करा . ठराव वाचून कायम करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १३९:-**

मा. आयुक्त सोा. यांनी शिफारस केलेल्या पुर्नविनियोजन विवरण पत्रकास आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देणेबाबत.

**ठराव क्र १४३ :-**

विषय :- सन २००७ ची दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई करणेबाबत.

महानगरपालिकेची दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामी येणारा खर्च हा (अ) सामान्य प्रशासन स्टेशनरी व छपाई या लेखाशिर्षा अंतर्गत केला जातो. सदर लेखाशिर्षा अंतर्गत रु. ३०,००,०००/- ची तरतुद केली असुन सदर तरतुदी अंतर्गत स्टेशनरी खरेदी, विविध प्रकारची छपाई, बोर्ड बॅनर छपाई व इतर किरकोळ खर्च या लेखाशिर्षा अंतर्गत केला जात असुन आज तगायत झालेल्या खर्चातुन रु. १३,०१,११२/- इतकी रक्कम शिल्लक आहे. सन २००६ या गतवर्षी छपाई केलेल्या दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईचा खर्च लक्षात घेता सन २००७ करीता रु. १५,००,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित अंदाजित येणार आहे.

महानगरपालिका अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार (अ) सामान्य प्रशासन स्टेशनरी व छपाई या लेखाशिर्षा अंतर्गत उर्वरित शिल्लक राहिलेल्या रक्कमेतील व इतर प्रस्तावित झालेल्या कामाचा खर्च पाहता दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामी या लेखाशिर्षकातुन खर्च अदा करता येणार नाही. तसेच यामध्ये वाढ होणे आवश्यक आहे.

सन २००७ ची दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई तरतुदीबाबत मा. लेखाअधिकारी तसेच मा. लेखा परिक्षण यांच्याशी चर्चा केली असता (अ) सामान्य प्रशासन वसुली खर्च (१६) मा. नगरसेवक प्रशिक्षण/प्रवासभत्ता या लेखाशिर्षा अंतर्गत रु. ३५,००,०००/- ची तरतुदीमधुन करण्यात यावा असे सुचित करण्यात आलेले आहे. सदरची तरतुदीमधुन होणारा खर्च मा. सचिव विभागाकडुन होत असल्याने आज तगायत झालेल्या खर्चातुन रु. २९,८०,०००/- इतकी रक्कम शिल्लक आहे. तरी (अ) सामान्य प्रशासन स्टेशनरी व छपाई या लेखाशिर्षा अंतर्गत रू. १५,००,०००/- ची वाढ केल्यास सन २००७ करिता दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई करण्याकामी येणारा खर्च सदर लेखाशिर्षा अंतर्गत करता येईल. सन २००७ करीता दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई कामास मा. स्थायी समितीची आर्थिक प्रशासकीय तसेच लेखा तरतुदीचे पुर्नविनियोजनास मंजु    री घेऊन कार्यवाही करणेस मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेली आहे.

तरी दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई बाबतच्या पुर्नविनियोजनाच्या विवरण पत्रकास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसुचि (ड) प्रकरण क्र. ७ मधील कलमानुसार मा.स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे. तसेच सन २००७ च्या दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई कामास येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. जेन्वी आल्मेडा** **अनुमोदन :- श्रीम. ज्युडी डिसोझा**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सन्मा. सदस्या ज्युडी डिसोजा यांनी प्रकरण क्र. १४० चे वाचन केले)

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १४० :-**

स्ट्रीट लाईट प्रस्तावांना मान्यता देणेबाबत.

**ठराव क्र. १४४ :-**

मिरा-भाईदर महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी स्ट्रीट लाईट पोल लावण्याबाबत मे. रिलायन्स एनर्जी लि. कंपनीकडे खालील प्रमाणे प्रस्ताव पाठविण्यात आलेले आहेत.

| अ.क्र | ठिकाणाचे नांव |
|---|---|
| १ | पेणकरपाडा खोडीयार नगर येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २ | कनाकीया रोड अंतर्गत स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ३ | भाईदर (प) विनायक मंदिर येथील पोल क्र. XUU 36/002,003,004,005,006 पोल उंची वाढविणे व वॉटेज बदलून डबल ब्रॅकेट करणे. |
| ४ | भाईदर (प) बालाजी नगर येथील पोल क्र. XUU 16/009,010 उंची वाढविणे. |
| ५ | भाईदर (पूर्व) रावल नगर येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ६ | भाईदर (प) जय बजरंग नगर अंतर्गत स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ७ | मिरारोड (पू) एस. के. स्टोन येथील त्रिवेदी कॉम्प्लेक्स येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ८ | भाईदर (पू) इंद्रलोक अंतर्गत डि.पी रोड येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ९ | भाईदर (पू) नवघर गांव येथील इंद्रप्रस्थ कॉम्प्लेक्स येथील रस्त्यावर स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १० | मिरागांव गंगा नगर येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ११ | मिरारोड (पू) शगुन हॉटेल ते विजय पार्क पर्यत स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १२ | मिरारोड (पू) रॉयल कॉलेज ते मिरा एम. आय. डी. सी. पर्यत स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १३ | पेणकर पाडा शिवमंदिर परिसर येथील पोल क्र. XFW 014/17 ते 19 डबल ब्रॅकेट पोल करणे. |
| १४ | काशिगांव येथील पोल क्र. XSV 006/067 ते 70 डबल ब्रॅकेट करणे. |
| १५ | घोडबंदर येथे रिलायन्स संग्राही केंद्र येथील रस्त्यावर स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १६ | महाजनवाडी मिरा गावठण येथे स्ट्रिट लाईट लावणे. |
| १७ | भाईदर (प) विनायक मंदिर येथील पोलची उंची वाढविणे |

| | |
|---|---|
| १८ | भाईदर (प) नारायण नगर येथील पोल डबल ब्रॅकेट करणे. |
| १९ | मिरारोड (पू) पुनमसागर कॉम्प्लेक्स येथे पोल लावणे. |
| २० | मिरारोड (पू) गोकूल व्हिलेज येथे हवेली रोडवर पोल लावणे. |
| २१ | भाईदर (प) जमनाबाई पाडूरंग ठाकूर मार्गावर पोल लावणे. |
| २२ | शिवार गार्डन जवळ अंतर्गत पोल लावणे. |
| २३ | मिरागाव मुन्शी कंपाउंड येथे पोल लावणे. |
| २४ | रसाज शॉपिंग मॉल मिरारोड (पू) येथे पोल लावणे. |
| २५ | त्रिवेदी कॉम्प्लेक्स एस.के. स्टोन जवळ पोल लावणे. |
| २६ | महालिंगेश्वर मंदिर वेस्टर्न, एक्सप्रेस हायवे मिरारोड (पू) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. |
| २७ | भाईदर (प) स्मशान रोड येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. |
| २८ | भाईदर (पू) जेसल पार्क सर्व्हिस रोड येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे |
| २९ | भाईदर (पू) बेबर्ली पार्क ते सॅटेलाइट पार्क पर्यत स्ट्रिट लाईट पोल लावणे. |
| ३० | भाईदर (प) गोम्स स्ट्रिट भाईदर गाव येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ३१ | भाईदर (पू) ओवर ब्रिज जवळ काशिमिरा रोड येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. |
| ३२ | मिरारोड (पू) शिव ओम हॉस्पिटल काशिमीरा रोड येथे पोल लावणे. |
| ३३ | शरायु कॉम्पलेक्स नया नगर मिरारोड (पू) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. |
| ३४ | मनी इन्कलेव्ह ते रामदेव पार्क काशिमीरा रोड भाईदर (पू) स्ट्रिट लाईट पोल लावणे. |
| ३५ | भाईदर (प) श्री. गिरनारी प्रसाद मंदिर रोड उत्तन भाईदर रोड येथे पोल लावणे. |
| ३६ | मोर्वा गाव भाईदर (प) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. |
| ३७ | मिरा MIDC रोड मिरागाव मिरारोड (पू) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. |
| ३८ | काशिगाव अंतर्गत सिल्व्हर सरिता ते क्लासिक पर्यत स्ट्रिट लाईट लावणे. |
| ३९ | राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वरील जरीमरी तलाव ते वेस्टन पार्क व लक्ष्मीबाग अंतर्गत पोल लावणे. |
| ४० | भाईदर (प) बाकोल स्ट्रीट, लेपोरा स्ट्रीट, मांडली स्ट्रीट येथे स्ट्रीट लाईट बसविणे. |

तरी वरील प्रस्तावना मान्यता देण्यात येत आहे. सदर ठरावाची त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी.

**सुचक :- श्रीम. ज्युडी डिसोझा.** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १४१चे वाचन केले.)

**जयंत पाटील :-**

शहरातील कोणते रस्ते आहे?

**दिपक खांबित :-**

शांतीनगरमधिल रस्ते आहेत.

(सन्मा. सदस्य श्री. एस. ए. खान यांनी प्रकरण क्र. १४१ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

इसमे एक ॲडिशन करो ना। विनायक नगरके यहाँपर, मोदी पटेल क्रॉस रोड है। वहाँपर अंम्बेमाता चौक है वो भी ॲड करदो।

**डॉ. रमेश जैन :-**

महाराणा अग्रसेन मार्ग वरिल शॉपिंग किधर है।

**दिपक खांबित :-**

मेन रस्तेपर ही है।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य डॉ. रमेश जैन साहब वो रोड जो है वो मेन रोड पे है।

**डॉ. रमेश जैन :-**

चौकमें रहना चाहिए ना। रोड एक ही है।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

चौकपे कैसे आएगा?

**डॉ. रमेश जैन :-**

मार्ग बोर्ड जो लगा है तो उसको हटाओ।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

उसको हटानेका नही। कोई बोर्ड हटानेका नही। डॉ. साहब, ऐसा है की, वो जो नाका है तो वो नाके पे चौक का नाम दिया है। ऐसा बहोतसे जगहपर तीन रस्ते का नाम दिया है।

(सन्मा. सदस्य एस. ए. खान यांनी प्रकरण क्र. १४१ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**हंसुकुमार पांडे :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**दिपक खांबित :-**

छत्रपती शिवाजी मार्ग पण असेच आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

डॉ. साहब, असे आहे की, बद्री नारायण रामदेव चौक आहे. परत, इकडे टेंबा हॉस्पिटल आहे. तिथे सुद्धा तीन रस्ते आहे. लादुराम चौक आहे. पुन्हा मोदी पटेल रोड आहे तिथे पण तीन रस्ते आहे. असे भरपुर ठिकाणी नाव आपण दिलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

पहिले नाव दिलेले आहे का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

अजिबात नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

जर पहिले नाव दिले आसेल तर, आपण.....

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपण तिचे नाव दिलेले नाही.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. १४१ :-**

रस्ते / चौकांना नावे देणेबाबत विचार विनिमय करुन मा. महासभेपुढे शिफारस करणे.

**ठराव क्र. १४५ :-**

वरील विषयानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील खालील रस्त्यान्या नावे देणे बाबत प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | रस्त्याचे / तलाव /चौकाचे नांव | मागणी केलेले नाव | मागणी करणा-याचे नांव |
|---|---|---|---|
| १ | घोडबंदर रेतीबंदर मे एम. टी. डी. सी. कडे जाणारा रस्ता | नेहरू नगर पिरपेठ्ठे शॉ दर्जा मार्ग | १)श्री. केशव घरत, नगरसेवक |
| २ | मिरारोड भागातील रस्ता (शांतीनगर) | श्री. जयगुरू जम्मेश्वर मार्ग | १) श्री. तुळशीदास म्हात्रे.<br>२) विश्नोई नवयुवक मित्र मंडळ |
| ३ | पेणकरपाडा सुकाळ तलाव | साईदत्त तलाव | ३) श्री. परशुराम म्हात्रे, नगरसेवक |
| ४ | श्री. महाराज अग्रसेन मार्गावरील चौक | स्वातंत्र्यसेनानी दामोदर भाई बंगेरा चौक | १) श्री. मिलन म्हात्रे ,नगरसेवक<br>२) श्रीम. नयना म्हात्रे,नगरसेविका<br>३) श्री. घ्रुवकिशोर पाटील,नगरसेवक |
| ५ | संगीता शॉपिग सेंटर समोरील महाराणा प्रताप मार्गावरील चौक | न्यायाधिश के. सदानंद हेगडे चौक | १) श्री. मिलन म्हात्रे नगरसेवक<br>२) श्रीम. नयना म्हात्रे, नगरसेविका<br>३) श्री. घ्रुवकिशार पाटील, नगरसेवक |
| ६ | साई कॉम्प्लेक्स, मिरारोड (पूर्व) रस्ता | पी. जी. व्होरा रोड | ४) प्रविण कुमार जी. व्होरा विदयालय |

वरील प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेमार्फत मा. महासभेत ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. एस. ए. खान.** **अनुमोदन :- श्री. हंसुकुमार पांडे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १४२चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य एस. ए. खान यांनी प्रकरण क्रं. १४२ चे सभागृहासमोर वाचन केले.)

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, हे जे आरक्षण आहे. ह्याच्याबद्दल जरा खुलासा करा. आरक्षण कशाबद्दल आहे. आणि कशासाठी करतो याच्याबद्दल खुलासा करा.

**मा. सभापती :-**

खतगांवकर साहेब, आपण याच्याबद्दल खुलासा करा की, ह्याच्यात आरक्षण कुठले आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

आरक्षण कुठले आहे?

(सन्मा. सदस्य एस. ए. खान यांनी प्रकरण क्रं. १४२ चे सभागृहासमोर वाचन केले.)

**हंसुकुमार पांडे :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**जेन्वी अल्मेडा :-**

आपण पहिला आरक्षणाचा खुलासा करावा. आमची ती मागणी आहे.

मा. सभापती :-

आरक्षणाचा खुलासा करावा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

सन्मा. सभापती साहेबांच्या सुचनेनुसार बोलता, प्रकरण क्र. १४२ निविदेला मंजुरी देणे बाबतचा जो विषय आहे. याचे आरक्षण १९२ आणि १९३ आहे. तर.....

**रतन पाटील :-**

साहेब, आरक्षण क्रमांक १९२ व आरक्षण क्र. १९३ हे नीट बघून घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आरक्षण क्र. १९२ हे लायब्ररी आहे. आणि आरक्षण क्र. १९३ मध्ये डिस्पेन्सरी मॅटर्निटी होम आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ह्यामध्ये तुम्ही पी.एस. आणि पी.जी. जे ॲड केले आहे. म्हणजे, पब्लिक स्पेस आणि पब्लिक ग्राऊंन्ड ॲड केले आहे ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्यामध्ये तळमजल्यावर ब्लड बँक, लायब्ररी व सेवागृह असे आहे. दुस-या आणि तिस-या मजल्यावर लायब्ररी, जेन्टस वॉर्ड आणि लेडिज वॉर्ड याप्रमाणे प्रस्तावित केलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ह्यामध्ये मॅटर्निटी होम कोठे गेला?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आता ह्यामध्ये पब्लिक सेमी पब्लिकच्या नावाखाली फक्त आपले प्रभाग कार्यालय चालविण्याचा हा महानगरपालिकेचा दृष्टीकोन आहे आणि त्यामध्ये सार्वजनिक वापर असल्यामुळे आणि एखाद्या दवाखान्यामध्ये ॲडमिनिस्ट्रेटिव्ह विंग राहू शकते.

**रतन पाटील :-**

लायब्ररी प्रायव्हेट होईल का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

लायब्ररीसाठी आरक्षण आहे. आणि लायब्ररी सुद्धा प्रस्तावितमध्ये ठेवलेली आहे.

**रतन पाटील :-**

आणि डिस्पेन्सरीसाठी प्रायव्हेट आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

डिस्पेन्सरीसाठी आपल्याकडे दवाखाना आहे.

**रतन पाटील :-**

आणि मॅटर्निटी होम?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

फक्त ह्यामध्ये प्रशासकीय प्रभाग कार्यालय ह्यासाठी जे आरक्षण नाही अशी आपली जी धारणा आहे. तर ते पब्लिक सेमी पब्लिक हेडखाली ही वास्तू असल्यामुळे त्याचा एका शिल्लक एफ.एस.आय. घ्यायला हरकत घेण्याचे काही कारण नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

रिझर्व्हेशन चेंज कसे करु शकता?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण अनुज्ञेय वापरामध्ये हे वापर प्रस्तावित केले आहे. व त्यासाठी आवश्यक नगररचना विभागाची अभिप्राय घेऊन हे कामकाज होत आहे.

**रतन पाटील :-**

उद्या हे करत असताना प्रशासनाची भुमीका तुम्ही आमच्यावर सोडुन देत आहे. पण, प्रशासनाने स्पष्ट खुलासा केला पाहिजे. ३७ च्या अंतर्गत आरक्षण बदली व्हायला पाहिजे की नाही, साहेब पहिला आरक्षण बदली व्हायला पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब , जिथे पब्लिक ग्राउंड आहे तिथे तुम्ही शाळा बांधणार का? म्हणजे शाळा जिथे आहे तिथे पब्लिक ग्राउंड बांधणार का?

**हंसुकुमार पांडे :-**

चांगले काम होत असेल त्याला कशाला आडवे टाकायचे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एम. आर. टी. पी ॲक्ट खाली....... ऑलरेडी त्या कामावर खर्च केलेला आहे.

**जेन्वी आल्मेडा :-**

मोठी चुक झाली तर आपण आणखी मोठी चुक करायची का? ती चुक दुरुस्त करुन घ्यायला पाहिजे की नाही.

**रतन पाटील :-**

३७ च्या अंतर्गत आरक्षण बदलायला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सर्व सन्मा. सदस्यांना मी माहिती देउु इच्छितो की, मा. आयुक्त साहेबांनी ऑलरेडी या जागेचे प्लॅन एम. आर. टी. पी ॲक्ट खाली मंजुर केलेले आहेत. आणि ते ऑलरेडी त्या ठिकाणी काम प्रस्तावित होउुन....

**रतन पाटील :-**

साहेब, हा घोषवारा अपूर्ण आहे. ह्याच्या बरोबर ते सगळे प्लॅन द्यायला हवे होते. नुसते कागदी तक्त्यात लिहून दिले जाते की हे असे होणार नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण निविदाच्या मंजूरीच्या वेळेस आलेल्या निविदा देतो. आतापर्यंत प्लॅन.....

**रतन पाटील :-**

साहेब, तरीसुद्धा घोषवारा आपल्या माहितीसाठी द्यायला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आणि या निविदा मा. महासभेच्या मंजूरीच्या नंतर काढलेले आहे. मा. महासभेने ऑलरेडी याला मंजूरी दिली आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, महासभेबद्दल आपण सांगत आहात तर, १८/०५/२००६ रोजी २० अन्वये व प्रशासकीय आर्थिक मान्यता कामी २ कोटी ४ लक्ष ७७ हजार रु. ची निविदा काढलेली आहे. आणि आज तुम्ही आमच्याकडून ३ कोटी रु.ची मंजूरी मागत आहात. ३ कोटी ६० लाख १६ हजार ७७७ रु. ची आमच्याकडे मंजूरी मागता हे कसे आहे? याबाबत प्रशासनाने खुंलासा करायला हवे, हे योग्य आहे का? महासभेचा ठराव २ कोटीचा रु. आहे आणि तुम्ही आमच्याकडे ३ कोटी रु. मागत आहोत? याबाबत प्रशासनाने खुलासा करा.

**हंसुकूमार पांडे :-**

उसमें सब हॉस्पिटल वगैरे सब आ गया उसमे ब्लड बँक लायब्ररी सब पण आता ते रेट वाढले आहे. स्टिलची व सिमेंटचे रेट वाढले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम, अभी खांबित साहेब बोले की, सब नगरसेवक नाम आया है। इसका मतलब क्या है? वहाँ मा. मुझफ्फर सेठ ने बनाया है। उनके निधीसे ही बनाया है। लोगोकी धारना हो वहाँ ऐसक बोर्ड भी बनाया है। वो आप अभी की परिस्थिती बताईए की, इसमें अभी तक कितने लोगों का पैसा लगाया हुआ है? कितने आमदार का पैसा लगाया हुआ है? और मिरा-भाईंदर महानगरपालिके का कितना पैसा लगा हुआ है? उसका डिटेल बताईए।

**रतन पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने किती खर्च केला आहे? दुसऱ्या आमदाराने किती खर्च केला आहे? त्याचा खुलासा प्रशासनाने द्यायला पाहिजे.

**दिपक खांबित :-**

ह्यामध्ये आमदार मा. मुझफ्फर साहेबा यांनी जवळ जवळ रु. ७० लाख आपल्याकडून दिलेले आहेत. मा. गणेश नाईक साहेबांचे गेल्यावर्षी रु. २० लाख आलेले आहेत आणि यंदासुद्धा त्यांचे पैसे येतील. आपल्याकडून रु. १ लाख दिलेले आहे. सय्यद म्हणून कोणीतरी आणून दिलेले आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पालिकेने दिलेले आहे.

**रतन पाटील :-**

आतापर्यंत पालिकेचा किती खर्च झाला?

**दिपक खांबित :-**

आतापर्यंत महानगरपालिकेने जवळजवळ रु. २५ ते ३० लाख खर्च केले आहेत. आणि आता हे जे काम आहे ह्याच्यामध्येसुद्धा या वर्षी आमदार तरतुदीतून आपल्याला निधी उपलब्ध करुन देणार आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

किती? आणि हे जे २ कोटी रु. आहेत. ते कोणाचे आहेत?

**दिपक खांबित :-**

ह्या २ कोटी रु. मधून जवळ जवळ आमदार साहेब १ कोटी रु. ---- देणार आहेत. गणेश नाईक साहेब आणि मा. मुझफ्फर हुसैन साहेब देणार आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

असे जर सगळे आमदार आहे तर सगळ्या आमदारांची नावे टाका ना. महापौरांचे पण नाव टाका. तुम्ही तिथे फक्त एकच नाव टाकले आहे. आजही असे सांगितले जाते की, सन्मा. मुझफ्फर हुसैन साहेबांनी हे केले. मग, श्री. गणेश नाईक साहेबांचे ही फंड आहे. पण, तिथे त्यांचे नावचं नाही.

**दिपक खांबित :-**

तसा आम्ही फलक बनवून लावू. ज्यांनी ज्यांनी फंड दिलेला आहे ना. तसा फलक लावू.

**रतन पाटील :-**

महापालिकेने त्याच्यावर ६० ते ६१ लाख रु. खर्च केलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

मग, तसा फलक लावा ना.

**दिपक खांबित :-**

तसा फलक लावू. जर, त्यांनी मागणी असेल तर...

**रतन पाटील :-**

मागणी असे कसे?

**दिपक खांबित :-**

ज्यांनी ज्यांनी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे ना. त्यांचा आपण फलक लावू.

**रतन पाटील :-**

मागणी असे कसे. ते द्यायलाच पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब, साहेबांनी कसे म्हटले की, ज्यांनी शासनाकडे नाव लिहिलेले आहे आणि फंड दिलेले आहे. त्यांचे नाव लिहा. साहेब, अजूनपर्यंत स्थायी समितीमध्ये असा सुद्धा ठराव झाला होता की, आपली जी आरक्षणाची जागा आहे. त्या जागेमध्ये आपण फलक लावू. तर, तुम्ही किती ठिकाणी फलक लावले.

**खांबित :-**

साहेब, हे कधी झाले?

**रतन पाटील :-**

महासभेत असा ठराव झालेला होता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

अजून तुमचे जर फलक लागले नाही. तर हा फलक कसा लागला.

**खांबित :-**

सगळ्यांपेक्षा आपण एक फलक लावू.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, हे चांगले काम आहे. चांगल्या कामाला विरोध नाही आहे. परंतु, हे जे चाललंय ते चुकीचे आहे.

**रतन पाटील :-**

प्रशासनाने अपूर्ण माहिती देऊन स्थायी समितीवर सगळे ढकलत आहे. साहेब, द्यायलाच खुलासा करा.

**ज्युडी डिसोझा :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलते. हा सर्व खर्च आमदार-खासदार निधीतूनच करावा.

**शशिकांत भोईर :-**

ज्यांनी ज्यांनी रक्कम दिले. त्या त्यांचे फलकावर नाव दाखवा ना की, यांनी एवढे दिले. त्यांनी तेवढे दिले.

**ज्युडी डिसोझा :-**

साहेब, हा सर्व खर्च आमदार खासदार निधीतून करावा आणि...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तसे प्रयत्न करुन जो निधी लागेल तो आपला काही टाकावा लागेल ना. सर्व असं करता येत नाही. कधी शासनाच्या सुचना आहेत आणि ज्या संस्था इंम्लिमेंट करतात, त्या संस्थेचा काही निधी तेथे टाकावा लागतो.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, ज्यांनी ज्यांनी पैसे दिले आहे. ज्याला निधी दिला आहे. त्याप्रमाणे बोर्ड लावू द्या ना. महापालिकेचे असेल तर तर महापालिकेला खर्च येईल ना. महानगरपालिकेचा किती खर्च झाला, ते सुद्धा दाखवयाचे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ही जी वास्तू आहे. ती कोणाच्या फंडातून बनते कोणाच्या प्रयत्नाने बनते, कोणाच्या सहकार्याने बनते ह्याचा काय?

**दिपक खांबित :-**

ही वास्तू महानगरपालिकेची आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग, तुम्ही तिथे असं सांगा की, ही वास्तू मिरा-भाईंदर महानगरपालिकेची आहे.

**हंसुकूमार पांडे :-**

पण, तिथे फंड कोणाचा लागतो? तिथे आमदारांचा फंड लागतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जिथे श्री. गणेश नाईक साहेबांचा फंड लागतो. तिथे नाव लावत नाही.

**हंसूकूमार पांडे :-**

ते बोलतात की, ते फलक लावणार आहेत. तुमच्यासमोर तर बोलतात की ते फलक लावणार.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आता सांगितले.

**रतन पाटील :-**

यांनी ह्याच्यामध्ये द्यायला पाहिजे होता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब मागे स्थायी समितीने असा निर्णय घेतला होता की, जे नवीन सन २००६-२००७ नवीन जिल्हा अध्यक्षतेनुसार तुम्ही आणा. पण, जिल्हा अध्यक्ष दर सुचीनुसार, २ कोटी २५ लाख रु. होतात. मग ३ कोटी ७ लाख रु.ची परमिशन कशी काय देणार?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्यामधील वस्तूस्थिती गोषवारामध्ये दिलेली आहे. ३ वेळा निविदा काढल्या गेल्या. आणि त्याचे जे दर आले आहेत. ते सुद्धा आपण या ठिकाणी नमुद केले आहे. आणि आता जे दर आलेले आहे. दर सुचीप्रमाणे त्यांचे कम्पॅरिझन केले. तर ते साधारणतः ३५% जास्तीचे आहे. आजच्या करंट दर सुचीप्रमाणे आहे. ही जी वस्तूस्थिती आहे आणि ह्याची कारवाई तशी, ही काही पहिली वेळ नाही. ह्याच्यापुढे सुद्धा २ वेळा निविदा भागविल्या गेलेल्या आहेत. हे फॅक्ट आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब ह्यामध्ये जर ऑडिट ऑब्जेक्शन निघाले. ऑडीट ची क्वेरी निघाली. आणि समजा हा फंड भरायला लागला. तर, ह्याची जबाबदारी आपणावरती राहीलं? प्रशासनावरती राहिलं.

**रतन पाटील :-**

ही जबाबदारी प्रशासनावरती राहिलं साहेब, समोर फॅक्ट आहे. १ कोटी रु. तफावत समोरासमोर येते आणि स्थायी समिती ह्याची जबाबदारी घेणार नाही. प्रशासनाने ह्याचा खुलासा करावा. प्रशासनाने ही जबाबदारी घ्यावी.

**जेन्वी अल्मेडा :-**

तुम्ही आमदार-खासदार फंडचे मजूरीसाठी येथे स्टॅडींग मिंटीगमध्ये कशाला आणलं?

**दिपक खांबित :-**

पहिलाच आहे. १० लाख रु. च्या वरती कुठलीही निविदा असेल तर....

**जेन्वी अल्मेडा :-**

पण, त्यांच्या फंडातून बांधलं जात आहे ना.

**दिपक खांबित :-**

महानगरपालिकेच आहे ना.

**जेन्वी अल्मेडा :-**

तिथे महानगरपालिकेचे नाव कुठे आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. आमदार फंडाच्या जो खर्च आपण करत असतो तर हे सर्व काम महानगरपालिकेचे आहे. ही सर्व इमारत महानगरपालिकेची आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, स्थायी समितीला किती लाखाची पॉवर आहे?

**दिपक खांबित :-**

अमर्याद आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

फक्त ५० रु. लाखांची पॉवर आहे?

**दिपक खांबित :-**

प्रशासकिय आर्थिक मंजूरी निविदा ५० रु. लाखाची आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रशासकिय मंजूरीच्या अमर्यादित अधिकार महासभेचे आहे. आणि निविदा मंजूरी करण्याचे अधिकार स्थायी समितीचे आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, बरोबर आहे. तुम्ही पण, ह्याच्यातली तफावत बघा ना. ह्या तफावतचा खुलासा करा ना. साहेब, तो खुलासा आपण करतच नाही. प्रशासन जबाबदारी घेत असेल तर घ्या. आमच्या मंजूरीची गरजच नाही आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

१० लाख रु. च्या वरच्या कोणत्याही कामाला आपल्या मंजूरीशिवाय आम्ही कधी काम करत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही मंजूरी मागितली नाही. तुम्ही प्रत्येक वेळी मंजूरी मागतात. पण ह्या ठरावामध्ये मंजूरी मागितली नाही. म्हणजे सदर निविदा ही सन २००६-२००७ ह्या नवीन व चालू जिल्हा सुचीतील दरापेक्षा ३५% जास्त दराने होत आहे. सदर माहिती मा. स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यात येत आहे. तर तुम्ही मंजूरी कोठे मागितली?

**दिपक खांबित :-**

विषयाचे नाव सांगा ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

विषयाचे नाव काय? पण असू दे पण तुम्ही मंजूरी कोठे मागितली आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही असा शब्दप्रयोग करु नका. हा विषय मा. प्रशासनाकडून आपल्याकडे मंजूरीसाठी आलेला आहे. त्याचा दुसरा काही अपेक्षित अर्थ नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब ठिक आहे. त्यामध्ये ॲडिशन करा की, ऑडिट ऑब्जेक्शन निघालं, ऑडिट क्वेरी निघाली काही लायबेलिटी निघाली तर ह्याची सर्व जबाबदारी प्रशासनावरती आहे. स्थायी समितीच्या सदस्यावरती जबाबदारी नाही.

**हंसुकूमार पांडे :-**

हॉस्पिटल प्रशासनाचे आहे ना. जागा प्रशासनाची आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, याबाबत खुलासा करता का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

महानगरपालिकेच्या कामामध्ये काही आक्षेप आल्यास जे मा. आयुक्त साहेबांच्या नावे आक्षेप येतात. आणि त्याची जबाबदारी मा. आयुक्त साहेब व प्रशासनाची असते.

**रतन पाटील :-**

मागे कल्याण-डोबिंवली महानगरपालिकेमध्ये अशाच प्रकारचे ऑडिट झालं आणि त्यांच्या सगळ्या स्थायी सदस्यांवर आक्षेप.

**दिपक खांबित :-**

तिथे काय झाले असते की, मा. आयुक्त साहेबांच्या गोषवारेविरुद्ध ठराव पास केले, म्हणून ते झालं.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

काही वेळेस गोषवारे न देतासुद्धा परस्पर ठराव होतात. विषय नसताना विशेष ठराव होऊन ज्यावेळेस अंमलबजावणी होते अशा वेळेस परिस्थिती होते.

**रतन पाटील :-**

असं नाही आहे की, चांगल्या शहरामध्ये चांगलं काम होत आहे आणि मी त्याला विरोध करतोय. हे असं व्हायला नको. पण, प्रशासनाची जी भूमिका आहे ती संशयास्पद वाटते.

**एस. ए. खान :-**

प्रशासनाची भूमिका ही किती वेळा अशी झालेली आहे?

**हंसुकूमार पांडे :-**

एवढया वर्षात काम होत नव्हेत. आता चालू झालं तर मध्ये टांग अडवायचे. ते प्रशासन जबाबदारी घेतात. ते बघणार ती नगरपालिकेची जमीन आहे. नगरपालिका ॲक्सेप्ट करतात. ते बोलतात ना.

**एस. ए. खान :-**

मा. आयुक्त साहेबांनी सांगितले की, काहीही येते ते मा. आयुक्त साहेबांच्या नावाने येते आणि आम्ही फेस करतो.

**हंसुकूमार पांडे :-**

कधी कुठल्या नगरसेवकाने फेस केले आहे?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

खतगांवकर साहेब मागे भिवंडी-महानगरपालिकामध्ये असेच आरोग्याची एक निविदा मंजूर केली होती. त्या इन्सेटिक्व आणि मेडिसीनमध्ये मंजूर केली होती. जर त्या निविदा दर अवास्तव असल्यामुळे त्या मंजूरी केल्यामुळे त्या स्थायी समितीचे सदस्य बरखास्त झाले. त्यामुळे त्यांना ती लायबिलीटी भरावी लागली.

**रतन पाटील :-**

भिवंडी महानगरपालिकेत असे कसे झाले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याची माहिती घ्यावी लागेल? आपण असं कमेंट करणे बरोबर नाही. कुठलाही रेफ्ररन्स कोठेही जोडून आपण कसं निर्णय देऊ शकतो.

**मा. सभापती :-**

ह्याची माहिती घेऊन खुलासा करा.

**रतन पाटील :-**

चांगले पद्धतीशीर ठराव आणा. कारण, विरोध व्हायला नको. विरोध जर करायचे असेल तर, आम्ही विरोध आताच दर्शवू. पण, प्रशासनाने चांगला खुलासा करावा. ह्यामध्ये काहीही नाही सगळं अर्धवट आहे आता ही जी चर्चा झाली. साहेब, आपण ज्येष्ठ आहेत. आम्ही प्रशासनाला खुलासा मागत आहोत. चांगल्या कामाला विरोध करत नाही. उद्या हे बालन्ट आपल्यावर येणार आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

गोषवारामध्ये स्पष्ट असे नमुद केले आहे की, या ३ वेळेस निविदा मागितलेल्या आहे. आणि ३ वेळेस निविदा मागूनही ते दर जास्तीचे आले आहे. हे फॅक्ट आहे.

**जयंत पाटील :-**

साहेब बरोबर आहे. मला एक सांगा की, २ कोटी २५लाख रु. तुम्ही देणार की, त्यांच्यावर पुन्हा काही टक्के फी वाढीव आहेत ते देणार आहात?

**दिपक खांबित :-**

दोन कोटी ४ लाख रु. वरती ५०% देणार आहोत.

**जयंत पाटील :-**

सन २००६-०७ चे रेट मागवले. ते आपल्याकडे आले आहे. पुन्हा त्याच्यावर ५०% वाढीव आहे का?

**दिपक खांबित :-**

त्यांच्यावर नाही, त्याच्यावर ३४% आहे.

**जयंत पाटील :-**

म्हणजे ५०% पूर्वीच्या वर झाले. म्हणजे हिशोब तोच झाला. तुम्ही नविनने रेट मागवले असते. त्याच्यावर पुन्हा वाढीव दर का लावले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नवीन रेटची टॅली केले ते ३४% ते ३५% वाढीव होते.

**जयंत पाटील :-**

साहेब, मला ते कळले आहे. तुम्ही पुन्हा वाढीव दर त्याच्यावर मागत आहात. म्हणजे, पूर्वी ५०% दिलेला तरी हिशोब तोच होतो आणि आताही दिलेला हिशोब तोच होतोय. सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी मागे सांगितले होते की, असे रेट वाढले, ट्रकचा खर्च वाढला. ते करुन आपण नवीनच मागवले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

इमारतीच्या कामाला निविदा एबॉव येतात. जनरल इमारती कॉन्प्रेरींग जिथे येथे ना .........

**एस. ए. खान :-**

आता हे चांगले काम झाले. तर, त्यासाठी विरोध कशाला देता.

**जयंत पाटील :-**

त्यासाठी मी विरोध करत नाही. चर्चा करतो आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

फ्लायओव्हर ब्रिज आपण बनवले तर फ्लाय ओव्हर ब्रिजवर किती वाढवून दिले. फ्लायओव्हर बनवला तेव्हा २८ करोड रुपयांचा खर्च झाला ना.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही दिली आहे. तुम्हीच सत्तेत होते. तशी यादी आहे. शहराचा विकास करायचा असेल, तर मग बोलू नका.

**ज्युडी डिसोझा :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलत आहे. असं जर असेल तर मग विषय मताला टाका.

**जेन्वी अल्मेडा :-**

मतदान घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्यामध्ये अजून चर्चा करुन विकास कामामध्ये आपले ॲनालसिस मिळायला हरकत नाही.

**जेन्वी अल्मेडा :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांनी जे भिवंडी महानगरपालिकेचे उदाहरण दिले आहे. त्या आधारीत तुम्ही सोईस्कर माहिती घ्या आणि पुढच्या मिटींगला घ्या. व घाई कशाला करत आहात?

**एस. ए. खान :-**

तीसरी वेळ झाली ना आता. किती वेळा विषय आणणार आहे?

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही पुढच्या मिटींगला विषय येऊ द्या. तुम्ही यात फक्त दोन कागद दिले आहे. ह्याच्यात तुम्ही प्लॅन द्या. मॅटरनिटी होम होणार आहे की, तेथे वाचनालय होणार आहे. असे व्यवस्थित प्लॅनिंग द्या ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्या संचितीमध्ये हे सर्व प्लॅन आहे.

**रतन पाटील :-**

कुठे आहे? आम्हाला दिलेल्या कागदावर फक्त वाचनालय आहे आणि इथे मॅटरनिटी होम दिलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पाटील साहेब, हा गोषवारा आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, आपल्याला हे प्लॅनिंग पाहिजे. इथे नुसते कागदावर लिहले आहे. तिथे टाकसाल होणार आहे. आता तिथे टाकासाल होणार आहे की नाही हे कोण बघणार आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्या संचितीला सर्व माहिती उपलब्ध आहे. पाहिजे असेल तर ती सर्व फाईल मागवता येईल आणि आपल्याला सर्व पाहता येईल.

**रतन पाटील :-**

साहेब, पण, हे आपण सर्व गोषवाऱ्यामध्येच द्यायला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. मुझफ्फर हुसेन साहेबांनी आपल्याला रु. ७० लाख दिले. ह्याच्यात कुठे नाही. मंत्री महोदय गणेश नाईक साहेबांनी २० लाख रुपये दिलेले आहे. आणि महानगरपालिकेने ६० लाख रुपये त्याच्यावर खर्च केले आहे. ते ह्याच्यावर काही दिले नाही. महानगरपालिकेने रु. ६० लाखाच्या वरती खर्च केला आहे. हे गोषवारामध्ये द्यायला नको का? आम्ही कशाच्या जागेवर काय करु? आता आम्हाला फक्त मा. मुझफ्फर साहेब यांचा आमदार निधी समजतोय.

**मा. सभापती :-**

हा विषय दोनदा आला.

**रतन पाटील :-**

साहेब, व्यवस्थित गोषवारा आणा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी तुम्हाला माहिती देऊ इच्छितो की, याबाबत प्रशासकीय आणि आर्थिक मंजुरी महासभेने दिलेली आहे. या ठिकाणी आलेल्या प्राप्त निविदा मंजुरीचा हा विषय आहे.

**रतन पाटील :-**

महासभेने दिलेली मजुरी तेवढीच करा. मग रु. ३ कोटी कशाला वाढवता आहात? महासभेने दिलेली आहे तेवढीच घ्या. रु. २ कोटी व रु. ३ कोटीमध्ये फरक आहे. रु. १ कोटीची तफावत आहे.प्रशासनाने याचा खुलासा करावा. सेंट्रल ऑडीटची क्युरी निघणार नाही का? आपले असे मत आहे.

**एस. ए. खान :-**

निघणार आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, स्पष्ट दिसत आहे. रु. २ कोटी व ३ कोटी यामधील तफावत जरी बाहेर गेली तरीसुध्दा उद्या हे प्रेसला गेले तर ..........

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापतीच्या परवागगीने बोलत आहे. मा. उपायुक्त साहेब, आपली ही इमारत बनली. श्री. खांबित साहेब यांनी आपल्या निर्दशणास आणून दिले की, ही बिल्डींग बनताना निविदा ४५ टक्के अबोव्ह होती. सन २००२ मध्ये ही बिल्डींग बनली होती आणि त्याचे ओपनिंग झालेली आहे. तद्नंतर आपला जो फ्लायओव्हर आहे . ती पण अबोव्ह गेली असे ते सांगातात तर ह्याचे ऑडीट झाले आहे की, नाही? ह्या इमारती बांधल्यानंतर त्यांचे ऑडीट झाले आहे की नाही? त्यांची ऑडीट रिपोर्ट काय झाले? आपल्याकडे जर उत्तर असेल तर त्याचा खुलासा करावा की, ऑडीटर रिपोर्ट तसा आला आहे. क्लिअर आहे ना मग काही हरकतच येणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब आता डिसीजन घ्या. सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब आणि सन्मा. सदस्य ज्युडी मॅडम बोलल्या की, ठरावाला मतदान टाकायचे आहे. तर तुम्ही डिसीजन घ्या.

**मा. सभापती :-**

ठरावाला टाकायचे असेल तर ठरावाला टाका.

**शशिकांत भोईर :-**

ठराव असे टाकु शकत नाही. कारण जर दोन ठराव आले ना तरच आपण मतदानाला टाकु शकतो. एकच ठराव आहे. त्यामुळे मतदान टाकु शकत नाही. तसा नियम आहे. मा. सचिव साहेब तसाच नियम आहे ना.

**नगरसचिव :-**

मतदानाची मागणी असेल आणि विरोधक जर पाहिजे असेल तर चार लोक मागवावे लागेल.

**शशिकांत भोईर :-**

पण दोन ठराव आले नाही. एकच ठराव आहे.

**नगरसचिव :-**

दुस-या ठरावाला त्यांचा विरोध ....

**शशिकांत भोईर :-**

जेव्हा दुसरा ठराव करणार तर?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, असे आहे की, ह्यांनी ठराव मांडला आणि मी विरोध केला तर ठराव फेटाळला गेला ना?

**नगरसचिव :-**

या ठरावावर आमचा विरोध आहे या ठरावार अस मतदान व्हायला पाहिजे.

**हंसुकुमार पांडे :-**

विरोध केलेला ठराव कुठे आहे?

**एस. ए. खान :-**

चार वर्ष झाली पाचवे वर्ष चालू झाले. अजुनपर्यंत आले नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

असे विषय आधी पण आले नव्हते.

**जेन्वी अल्मेडा :-**

असे विषय पण आले नव्हते.

**हंसुकुमार पांडे :-**

फ्लायओव्हरचा पण असाच विषय झाला.

**एस. ए. खान :-**

फ्लायओव्हर ब्रिजचे पण क्लीअर झालेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, यापूर्वी मी या विषयावर चर्चा केली आहे. सर्वांना समजावून सांगितलं आहे. श्री. खांबित साहेबांनी सुचना मागितली की, आपण बोर्ड लावू. तसेच प्रत्येक आमदारांचा, खासदारांचा महानगरपालिकेने किती दिलेले आहे. त्याचा फिगर टाका. आजपर्यंत त्यांनी किती खर्च केलेला आहे. तद्‌नंतर आम्ही खुलासा केला. जर ही इमारत बांधताना ४५% अबोव्ह दिला आहे आणि फ्लायओव्हर ब्रिज बांधताना अबोव्ह दिले आहे आणि ऑडीट फंड निघाला नाही. तर याचा अर्थ काय?

**रतन पाटील :-**

साहेब, मा. महासभेची जी मान्यता आहे रु. २ कोटी ४ लाख ७७ हजार ८५२ रु. ला आम्ही मान्यता देतो असे असेल तर मा. महासभने आमच्याकडे अशा पध्दतीने पाठवले आहे. तुम्ही जर मा. महासभा आणि स्थायी समितीवर वेगवेगळे दाखवतात. तर मग आम्ही मा. महासभेची मान्यता देतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही इथे तांत्रिक डिस्कशन या ठिकाणी काढतात. मा. महासभेने आर्थिक, प्रशासकीय मंजुरी दिल्यानंतर दरपत्रक मागविण्यात आले आणि त्या दरपत्रकामध्ये जे अबॉव्ह रक्कम आहे. प्रशासकीय मंजुरीच्या जास्तीची खर्चाची ज्यावेळेस बाब येईल. त्यावेळेस पूर्ननियोजन मान्यता ते घेतील. त्याशिवाय ते बिल अदा केले जाणर नाही. २ कोटी रु. आणि प्रशासकीय मंजुरी आहे. त्याच्यापेक्षा जास्तीचा खर्च सुधारीत प्रशासकीय मंजुरी केल्याशिवाय प्रशासनाला करता येणार नाही. ही बाब महानगरपालिकेसमोर एकदा येऊन जाईल. आज ही प्रशासकीय मंजूरीच्या आलेल्या निविदावर निर्णय करावयाचा आहे. आणि त्या निविदा जर आपण मान्य केले. आणि त्याच्यापेक्षा ३४% अबोव करंट डी.एस्.आर. प्रमाणे आणि जून्या ५०% अबोव जे रक्कम होईल. जी काही प्रशासकीय मंजूरी आहेत. ती २ कोटी रु. पर्यंत खर्च करण्याचे त्यांना अधिकार राहतील. ठेकेदारांकडून जे जास्तीचे खर्च मंजूर करावयाचे आहेत. ते महासभेचे रिवाईज मंजूरी घेऊनच भविष्यात बिल अदा होतात. आपल्या मुद्‌दयाला मी जस्टीफिकेशन देत आहे की, ती निविदा २ कोटी रु. ची नसून निविदा मंजूर करण्याचा निर्णय राहिल.

**रतन पाटील :-**

साहेब, इथे स्पष्ट लिहीले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रशासकिय मंजूरीपेक्षा जास्त खर्च करण्याची अडचण ज्यावेळेस उद्‌भवेल त्यावेळेस प्रशासकीय मंजूरी देणाऱ्या ॲथॉरिटीकडे तो रिवाईज प्रकरण पाठवला जातो. आणि त्यावेळेस रिवाईज मंजूरी मिळते.

**रतन पाटील :-**

पण, ह्यात तफावत आहे. आजचा मा. स्थायी ठराव आहे आणि महासभेचा ठराव यामध्ये किती तफावत आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. स्थायी सभेचा ठराव हा निविदा मंजूरीचा ठराव राहिल. प्रशासकिय मंजूरी ही महासभेने दिलेली आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही महासभेचा ठराव घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य श्री. पाटील साहेब, यांचा मुद्‌दा आपल्या लक्षात आला आहे ना?

**रतन पाटील :-**

जर मा. महासभेचा ठराव घेत असाल तर, मग मॅडम म्हटल्याप्रमाणे ठराव मतदानाला घ्या. आम्ही त्याच्या विरोधात नाही. तुम्ही मा. महासभेचा ठराव घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, हा जो विषय आहे ह्याच्यामध्ये मा. आयुक्त साहेबांना, सगळ्या सदस्यांनी डिमांन्ड केली होती की, जी रिझर्व्हेशन चेंज होत आहे. आणि जिल्हा दर सुचीनुसार आपण जे मागे मागितलं होते. त्यामध्ये सुद्धा थोडी तफावत आहे. तर, माझे असे मत आहे की, श्री. घेवारे साहेब आहेत याच्याशी चर्चा करुन निर्णय घ्यावा. आणि आता जर श्री. घेवारे साहेब नसतील तर हा विषय तहकूब करुन पुढच्या बुधवारच्या मिटींगला ते पुन्हा आणा.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. हा विषय तहकूब करतो. तो विषय पुढच्या मिटींगला आणू द्या.

**हंसुकूमार पांडे :-**

साहेब, आपण विषय तहकूब करु शकतो का?

**मा. सभापती :-**

हो. मी विषय तहकूब करु शकतो. पुढच्या बुधवारच्या मिटींगला मी विषय आणतो ना. पुढचा विषय घ्या.

**दिपक खांबित :-**

ठराव झालेला आहे. फक्त निर्णय तहकूब आहे ना.

**मा. सभापती :-**

निर्णय तहकूब आहे ना.

**दिपक खांबित :-**

ठराव मांडलेला आहे.

**हंसुकूमार पांडे :-**

आम्ही ठराव मांडलेला आहे.

**मा. सभापती :-**

पण ठराव कुठे झालेला आहे?

**हंसुकूमार पांडे :-**

साहेब, ठराव वाचून झालेला आहे.

**मा. सभापती :-**

रुलिंग बाकी आहे. ठराव झालेला नाही.

**दिपक खांबित :-**

साहेब, रुलिंग बाकी आहे.

**मा. सभापती :-**

रूलिंग बाकी आहे. ठराव झालेला नाही. हा विषय तहकूब आहे. तर हा विषय मी पुढच्या मिटींगसाठी घेतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

या ठरावावरती जो निर्णय आहे तो पुढच्या मिटींगला येईल.

**मा. सभापती :-**

विषय पुढचा घ्या.

**प्रकरण क्र. १४२ :-**

निविदांना मंजुरी देणे. (सार्व. बांधकाम विभाग) (मा. स्थायी समिती सभा दि. ०१/११/२००६ प्रकरण क्र. १२७ अन्वये तहकुब प्रकरण)

**ठराव क्र. १४६ :-**

मा. सभापती सो. यांच्या आदेशानुसार सदर विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यात आले.

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. १४३ चे वाचन केले.)

**जयंत पाटील :-**

कांबळे साहेब, तुम्ही इकडे काय लिहिले की, खतनिर्मितीचा प्रकल्प हाती घेतला असून सदरचा प्रकल्प पूर्ण होणे अद्यापी सहा महिने आहे. चार महिन्यापूर्वी मा. महासभेत हा विषय होता. तेव्हा तुम्ही सहा महिने म्हटले होते. आणि आजही तुम्ही सहा महिने म्हणता.

**राजकुमार कांबळे (एस. आय.) :-**

सहा महिन्याच्या आत होईल.

**जयंत पाटील :-**

सहा महिन्याच्या आत म्हणजे किती दिवसात? मा. महासभेमध्ये त्यांनी सहा महिन्याची आपल्याला मुदत दिली होती. आणि आता ही सहा महिनेच आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आजची माझी माहिती अशी आहे की, लिस्ट ॲग्रीमेंट अजून झालेले नाही. मी हे श्री. संदिप शिंदे यांना विचारले तेव्हा त्यांनी असे सांगितले की, झालेली नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

डॉक्टर साहेब, आपल्या इथे ४०० साडे ४०० मॅट्रिक टन कचऱ्याच्या विल्हेवाटसाठी बी.ओ.टी. वर राजकोटच्या धर्तीवर मा. महासभेने प्रस्ताव मंजुर केलेला आहे. एजन्सी सुद्धा निश्चित झालेली आहे आणि सर्व सन्मा. गटनेते आणि मा. महापौर, संबंधित खात्याच्या अधिकारी हे सगळे राजकोटला जाउन तो प्रोजेक्ट पाहून आलेले आहेत. आवश्यकता भासल्यास आपण सुद्धा पाहून या आणि त्या एजन्सीला टाईम शेडयूल तयार करून त्याच्या कामाचा जो आर्ट असतो. तसेच, आपण कोणत्याही कामामध्ये नियोजन करतो. त्या पद्धतीने ते काम पावसाळ्याच्या पूर्वी ते झाले तर आपल्याला ती फार आनंदाची बाब आहे. नाहीतर, आपल्याला भविष्यात

फार मोठ्या संकटाला सामोरे जावे लागेल. पावसाळ्यापूर्वी कचरा टाकू देणार नाही. आणि शहरामध्ये मोठा इश्यू तयार होईल. तो प्रस्ताव त्या टाईम शेडयूल मध्ये म्हणजे तुम्ही त्याच्यामध्ये वेळ दिला. तर तुमची ती अचिव्हमेंट राहिल.

**जयंत पाटील :-**

तुम्ही कचरा टाकायला कुठे जागा देत असेल. सन्मा. सदस्या जेन्वी अल्मेडा यांनी प्रकरण क्र. १४३ च्या ठरावाचे वाचन केले.

**ज्युडी डिसोझा :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव मंजूर करण्यात येत आहे. आणि ठराव कायम करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १४३:-**

निविदांना मंजुरी देणेबाबत. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. १४७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातुन निघणारा दररोज सुमारे ४०० ते ४५० मेट्रीक टन घनकचऱ्याचे विल्हेवाट लावणे करिता महापालिकेने खत निर्मितीचा प्रकल्प हाती घेतला असून सदरचा प्रकल्प पुर्ण होणेस अद्याप ६ ते ७ महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. दरम्यान काळात शहरातुन दररोज निर्माण होणारा कचरा खजगी जागा उपलब्ध करून विल्हेवाट लावण्यात येते व त्यावर मातीचा भराव करण्यात यावा. कचऱ्यावर मातीचा भराव केल्यास दुर्गंधी येत नाही. याकरिता सदर कचऱ्यावर तातडीने मातीचा भराव करणे अत्यावश्यक आहे. सदर प्रस्तावास मा. स्थायी समिती सभा दि. ११/१०/२००६, ठराव क्र. ११५ अन्वये मंजुरी प्राप्त आहे. त्यानुसार दि. १९/१०/२००६ रोजी दै. हमारा महानगर व मुंबई संध्या या वृत्तपत्रात जाहिर निविदा मागविल्या असता खालीलप्रमाणे निविदेबाबतचे दर प्राप्त आहेत.

| अ.क्र. | संस्था कंपनीचे नाव | दर प्रती ब्रास |
|---|---|---|
| १. | मे. अपूर्वा कंन्स्ट्रक्शन | रु. ६५५/- |
| २. | मे. बैज्यु कंन्स्ट्रक्शन | रु. ६३५/- |
| ३. | मे. खूशी कंन्स्ट्रक्शन | रु. ६६४/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता महानगरपालिका क्षेत्रातुन दररोज निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर माती भराव करणेकामी मे. बैज्यु कंन्स्ट्रक्शन यांनी सादर केलेली सवार्त कमी दराची निविदा स्विकारणेस ही सभा मान्यता देत असून शहरातुन दैनंदिन निघणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे ही अत्यावश्यक बाब असल्याने कचऱ्यावर मातीचा भराव करणे कामी आलेले दर प्रकल्प कार्यान्वित होईपर्यंत मंजुर करण्यात येत असून, ह्याकामी येणारा खर्च सन २००६-०७ या आर्थिक वर्षात घनकचरा व्यवस्थापन (प्रक्रिया व विल्हेवाट) याशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीतुन करणेस ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. जेन्वी अल्मेडा.** **अनुमोदन :- श्रीम. ज्युडी डिसोझा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब आज जो विषय झाला. त्याच्यामध्ये ज्या ज्या विभागाची वसूली कमी केली. अशा सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलवून त्यांचा आपण आढावा घेउ. त्याचबरोबर सभा सुरू होण्यापूर्वी मी तुम्हाला साफ सफाई बद्दल चर्चा करायला सांगितले होते आणि तुम्ही ती चर्चा घेणार होतात. मग, आता घ्यायची का?

**रतन पाटील :-**

टेम्पो स्टॅण्डबद्दल आपण थोडीशी चर्चा करुया.

**तुळशीदास म्हात्रे :-**

या टेम्पोविषयी मी कालच पत्र लिहिले आहे. टेम्पो तिकडे कसे आले? म्हणजे प्रशासन कमजोर आहे, असे वाटते का?

**मा. सभापती :-**

पर्यायी जागा द्या मी मंजूरी द्यायला तयार आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

अध्यक्षतेखाली टेम्पो स्टॅण्डकरिता बाजार विभाग, अतिक्रमण विभाग, जाहिरात विभाग, बांधकाम विभाग त्यांच्यावर आपण निर्णय घेउ या.

**मा. सभापती :-**

त्याच्यावर तातडीने बैठक लावतो.

**शशिकांत भोईर :-**

माझा साफ-सफाई संबंधीत विषय होता. डॉक्टर साहेब, आपल्याशी संबंधित आहे. आज माझ्या वॉर्डमध्ये जो मजूर पुरवठा केला जातो तो कमी केला जातो. पण, आपल्या या विभागातून पूर्ण मजूर पुरवठा केल्याचे त्यांना बिल मिळते. आणि त्या मजूर पुरवठा करणाऱ्यांनी त्या मजूरांना फावडी साफ-सफाईसाठी झाडू, कचरा उचलण्यासाठी गाडया दिल्या पाहिजेत. तर, गाडया नाहीत तर महानगरपालिकेचे धोरण नक्की काय होते. त्यांच्याकडून काय सुविधा उपलब्ध करुन घ्यायच्या होत्या? त्याच्यावर आपले एस्. आय्. लोकांचे कंट्रोल आहे की नाही? माझ्या मते, ते नाही. म्हणून हा विषय मी चर्चेला आणला आहे. मला पत्र मिळाले आहे. परंतु, श्री. कांबळे साहेबांनी त्याबद्दल खुलासा केला पाहिजे. त्यांच्याकडून आपण काय डिमांड केले आहे.

**राजकूमार कांबळे (एस. आय.) :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलत आहे. ज्यांना आपण काम दिले आहे. त्यांना फावडे, घमेले तसेच जे आवश्यक साहित्य आहे. ब्रश, झाडू वगैरे ते पुरवठ्यांचे त्यांना बंधनकारक आहे. आणि त्याप्रमाणे त्यांच्याकडे आढळून आले असेल तर त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**शशिकांत भोईर :-**

मी तुमच्या निर्दशनास आणून दिले आहे. त्यांना गाडया नाहीत, झाडू नाही त्यामुळे ते काम करत नाही. तसेच कचरा उचलण्यासाठी डंम्परचा पुरवठा करतात. जेव्हा २-३ महिन्यांमध्ये कचरा उचलला जात नव्हता. म्हणून आपण एक्स्ट्रा घेतले.

**राजकूमार कांबळे (एस.आय.) :-**

एक्स्ट्रा डंम्पर घेतले आहेत. मजूर घेतले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

त्यांनी जी सुचना मांडली आहे, त्याचा कार्यान्वित होण्यासाठी संबंधित ठेकेदाराला मुद्दा देऊन त्याची अंमलबजावणी करुन घ्या आणि त्याची गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्या.

**राजकूमार कांबळे (एस.आय.) :-**

चालेल.

**शशिकांत भोईर :-**

कचरा उचलण्यासाठी जो डंम्पर प्रॉब्लेम झाल्यामुळे आम्हाला काही ठिकाणी कचरा भरून ठेवावा लागतो. आणि रात्रीच्या वेळी तो खाली करावा लागते. त्यासाठी एक्स्ट्रा डंम्पर घेतला. त्यासाठी एक्स्ट्रा मजूर घेतलेले नाहीत. फक्त वाहन उपलब्ध करुन घेतलेले आहे ह्या मजूरातून वाहतुकीसाठी त्याचा वापर करण्यात येतो.

**शशिकांत भोईर :-**

पण, आताही जे माझ्या ४ नंबर वॉर्ड मध्ये डंम्पर लावले आहेत. त्याची आवश्यकता नसताना सर्व मजूर आहेत. आता पहिले साठवणूक कचरा होता. डंम्पिंग नव्हते. आता आवश्यकता नसतानाही डंम्पर फिरतात. आणि जे साफ-सफाई करणारे कर्मचारी....

**राजकूमार कांबळे (एस.आय.) :-**

आम्ही ते बंद करु शकतो. पण, पुन्हा वॉर्ड मध्ये तक्रारी आल्या तर तुम्ही बघा.

**शशिकांत भोईर :-**

तक्रार येतील तेव्हा बघू ना. जो ठेकेदार मजूर-पुरवठा करतो. तो साफ-सफाईसाठी करतो. आणि त्यांनीच जर कचरा भरून नेला. तर त्याच्यावर काय कारवाई करणार?

**राजकूमार कांबळे (एस.आय.) :-**

आम्ही फक्त एक्स्ट्रा डंम्पर घेतले आहे. आम्ही मजूर घेतले नाही.

**शशिकांत भोईर :-**

आता जो एका वॉर्डमध्ये एक मजूर फिरत होता दुसरा गेला तर दोन मजूर झाले ना. त्याच्यावरती जे आपले मजूर पुरवतात. ते लोकच कचरा उचललात.

**राजकूमार कांबळे (एस.आय.) :-**

बरोबर आहे. त्याला एक्स्ट्रा मजूर दिलेलेच नाही. फक्त त्याला वाहन दिलेले आहे. मध्यतंरी जो प्रॉब्लेम झाले ना. त्यावेळेला वाहन उपलब्ध करुन दिले.

**मा. सभापती :-**

त्याच्यावर जे काही ते बोलत आहेत. ते लक्षात ठेवा. त्याच्यावर कारवाई करा. मागील सत्राप्रमाणे आजची सभा देखील चांगल्या तऱ्हेने केली व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. म्हणून सर्वांचे आभार व्यक्त करुन आजची सभा संपल्याची मी जाहिर करतो. धन्यवाद.

**(सभा संपल्याची वेळ संध्या. ५.२० वा.)**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**